गुरुवार, 21 जुलै 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 314
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 21 JULY 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-314 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# ओबीसींना राजकीय आरक्षण

## बांठिया आयोगाच्या अहवालानुसार निवडणुका घेण्याचे कोर्टाचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीतील ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. सुप्रीम कोर्टाने आज बाठिंया आयोगाचा अहवाल मान्य केला असून या अहवालानुसार निवडणुका घेण्याचे निर्देश कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. याशिवाय राज्यात रखडलेल्या निवडणुका तातडीने घेण्यासंदर्भात पावले उचलण्यासही कोर्टाने सांगितले आहे. येत्या दोन आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर करा, असे आदेश दिले आहेत.**

जयंतकुमार बाठिंया आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये ओबीसांनी स्थानिक स्वराज संस्थांमध्ये २७ टक्के पर्यंत आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस केली होती. कोर्टाने हा अहवाल मान्य केल्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के राजकीय आरक्षण मिळणार आहे.
राज्यात ९२ महानगरपालिका आणि ४ नगरपंचायतीच्या निवडणुका रखडल्या आहेत. या निवडणुकी संदर्भातील कार्यक्रम येत्या दोन आठवड्यात जाहीर करण्याच्याही सूचना सुप्रीम कोर्टानं दिल्या आहेत. त्यामुळे ओबीसींच्या राजकीय आरक्षणाची कोंडी फुटल्याचे म्हटले जात आहे.

**बांठिया आयोगाच्या अहवालात नेमके काय दडले?**

बांठिया आयोगाने ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण देताना लोकसंख्येच्या प्रमाणात ते देण्यात यावे असे आयोगाने म्हटले आहे. ओबीसी राजकीय आरक्षण देताना ५० टक्के मर्यादा ओलांडली जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे म्हटले आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आरक्षणाला धक्का न लावता ५० टक्के मर्यादेत ओबीसी आरक्षण द्यावे, अशी शिफारस बांठिया आयोगाने केली आहे. बांठिया आयोगाने हा अहवाल राज्य सरकारकडे ७ जुलै रोजी सादर केला होता.

### नव्या सरकारचा पायगुण चांगला : मुख्यमंत्री



राज्यातील ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण मिळाले पाहिजे हीच भूमिका युती सरकारची होती. त्यासाठी, आम्ही वेळोवेळी दिल्लीत सिनियर कॉन्सिलशी चर्चा केली, बैठका घेतल्या. नवीन सरकारचा पायगुण ओबीसी समाजासाठी चांगला आहे. म्हणून, आज ओबीसी समाजाच्या बांठिया आयोगाच्या शिफारसी सर्वोच्च न्यायालयाने स्विकारल्या आहेत. त्यामुळे, निवडणुकीत ओसीबी समाजाच्या आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या आरक्षणासाठी मदत करणाऱ्या, प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे मी आभार मानतो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

### महायुतीने शब्द पाळला, फडणवीसांनी मानले आभार




सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी राजकीय आरक्षणाचा महायुती सरकारने दिलेला शब्द पाळला असल्याचे सांगत पहिली प्रतिक्रिया दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ट्विटद्वारे देवेंद्र फडणवीस म्हणाले, ओबीसी राजकीय आरक्षणाचा आमच्या महायुती सरकारने दिलेला शब्द पाळला! सर्वोच्च न्यायालयातून ओबीसी राजकीय आरक्षणाला मान्यता मिळणे हा संपूर्ण ओबीसी समाजाचा विजय आहे. ओबीसी कल्याण, बहुजन कल्याण, गरिब कल्याण हाच आमचा अजेंडा होता, आहे आणि राहील. ओबीसी राजकीय आरक्षण प्राप्त करून देण्याच्या प्रक्रियेतील सहभागी सर्वांचे मनःपूर्वक आभार!

### ओबीसी समाजाला नेमका काय फायदा होणार?

ओबीसी प्रवर्गातील लोकप्रतिनिधींना महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायतीच्या प्रमुख पदावर काम करण्याची संधी मिळेल. राज्यात ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या, २४१ नगरपालिका, २७ महापालिका, १२८ नगरपंचायती आणि २७८३१ ग्रामपंचायती आहेत. महापालिकांमध्ये बांठिया आयोगानुसार २६ टक्के आरक्षणाप्रमाणे ७ महापालिकांचे महापौर पद ओबीसी प्रवर्गातील लोकप्रतिनिधीला मिळेल. राज्यातील २४१ नगरपालिकांपैकी २७ टक्के ओबीसी आरक्षणाप्रमाणे ६६ नगरपालिकांचे नगराध्यक्षपद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव होईल. १२८ नगरपंचायतीपैकी ३७ ठिकाणी ओबीसी प्रवर्गासाठी अध्यक्षपद राखीव असेल. नगरपंचायतीमध्ये देखील ओबीसींना २७ टक्के आरक्षण मिळेल.

## चर्चेतली बातमी

### रानिल विक्रमसिंघे श्रीलंकेचे नवीन राष्ट्रपती



आधुनिक केसरी न्यूज

**कोलंबो :** श्रीलंकेमध्ये आज नव्या राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत श्रीलंकेचे काळजीवाहू राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे निवडून आले आहेत. मागील ४४ वर्षात प्रथमच श्रीलंकेच्या संसदेत राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक घेण्यात आली. काळजीवाहू राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांच्याशिवाय दुल्लस अल्हप्पारुमा आणि अनुरा कुमारा दिसानायके हे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात होते. २२५ सदस्य असणाऱ्या श्रीलंकेच्या संसदेत बहुमत मिळवण्यासाठी ११३ मतांची आवश्यकता होती. रानिल विक्रमसिंघे यांना स्पष्ट बहुमत मिळाले असून त्यांना १३४ मते मिळाली आहे. श्रीलंकेचे राष्ट्रपती गोताबया राजपक्षे यांनी १४ जुलै रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे तत्कालीन पंतप्रधान रानिल विक्रमसिंघे यांनी काळजीवाहू राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला होता.

## सिद्धू मुसेवालांची हत्या करणाऱ्या दोन आरोपींचा चकमकीत खात्मा

आधुनिक केसरी न्यूज

**अमृतसर :** प्रसिद्ध पंजाबी गायक सिद्धू मुसेवालांची भरदिवसा ३० गोळ्या झाडून हत्या करणाऱ्या दोन आरोपींचा अमृतसरजवळ झालेल्या चकमकीत मृत्यू झाला आहे. सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील दोन संशयित शार्पशूटर आणि पंजाब पोलिसांच्या तुकडीमध्ये बुधवारी (२० जुलै) दुपारी दोनच्या सुमारास अटारी सीमेजवळ चकमक झाली. या चकमकीत पंजाब पोलिसांनी दोन्ही संशयितांचा खात्मा केला. अमृतसरजवळच्या गावात चकमक सुरू झाल्यानंतर पोलिसांनी ग्रामस्थांना घरातच थांबण्याच्या सूचना दिल्या होत्या. ही चकमक जवळपास ३ तास चालली.
अटारी सीमेजवळच्या भाकना कालन गावामध्ये ही चकमक झाली. हल्लेखोर गावातील एका बंगल्यामध्ये लपल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी या बंगल्याला सर्व बाजूंनी घेरले. ज्या ठिकाणी ही चकमक झाली, तो भाग भारत पाकिस्तान सीमेपासून जवळ असल्याने हे हल्लेखोर पाकिस्तानमध्ये पळून जाण्याची शक्यताही वर्तवण्यात आली होती. पोलिसांनी आरोपींकडून एके-४७, पिस्तुल व इतर साहित्य जप्त केले आहे.

## शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रतेचा निकाल लांबणीवर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** एकनाथ शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपत्रातेबाबतचा निर्णय पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १ ऑगस्ट रोजी ठेवली आहे. आजच्या सुनावणीदरम्यान शिवसेना आणि एकनाथ शिंदे गटाच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. शिवसेनेचे वकील कपिल सिब्बल यांनी या प्रकरणाची सुनावणी तातडीने होण्याचा आग्रह धरला होता. मात्र, एकनाथ शिंदे यांचे वकील हरिश साळवे यांनी कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदत हवी असल्याचे सांगितले. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानेही या प्रकरणाला घटनेतील अनेक कायद्यांचे कंगोरे असल्याचे म्हटले. त्यामुळे आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १ ऑगस्ट रोजी होणार आहे. मात्र, २७ जुलैपर्यंत दोन्ही बाजूंना प्रतिज्ञापत्रद्वारे आपली भूमिका मांडावी लागणार आहे. आता या ११ दिवसांच्या काळात शिवसेना पक्षातील आणखी काही लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी फुटून वेगळीच परिस्थिती निर्माण होते का, हे पाहावे लागेल.
सरन्यायाधीश एन.व्ही. रमण्णा यांनी सुनावणीदरम्यान अनेक महत्त्वपूर्ण टिप्पण्या केल्या. काही मुद्दे अतिशय घटनात्मक



असल्याने तातडीने सुनावणी आवश्यक असल्याचे म्हटले. सरन्यायाधीशांनी दोन्ही बाजूंना मंगळवारपर्यंत शपथपत्र दाखल करण्यास सांगितले आहे. या सुनावणी दरम्यान सरन्यायाधीशांनी हे प्रकरण मोठ्या खंडपीठासमोर नेणे गरजेचे असल्याची टिप्पणी केली होती. मात्र, त्याबाबत त्यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. तसेच गटनेता बदलणे हा पक्षाचा अधिकार आहे. त्याशिवाय, बहुमताने सदस्य निवडू शकतात. एखादा वाद उद्भवल्यास विधानसभा अध्यक्ष हस्तक्षेप करू शकतात, असे सरन्यायाधीशांनी म्हटले.

### गुवाहाटीला जाण्याच्या एक दिवस आधीच पत्र कसे पाठवले?

या सुनावणीदरम्यान अभिषेक मनु सिंघवी यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले. यावेळी त्यांनी भाजपच्या दोन आमदारांनी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावाचा मुद्दा उपस्थित केला. शिंदे गटाचे आमदार गुवाहाटीला जाण्याच्या एक दिवस आधी दोन आमदारांनी विधानसभा उपाध्यक्षांना ई-मेल पाठवला. हे अविश्वास पत्र होते. त्यानंतरही उपाध्यक्षांनी आमदारांनी पाठवलेल्या या पत्राची दखल घेतली जाणार नाही, असे अधिकृतपणे नोंदवले. परंतु, शिंदे गटाचे आमदार गुवाहाटीला जाण्यापूर्वी एक दिवस आधीच हा ई-मेल कसा पाठवण्यात आला, असा सवाल अभिषेक मनु सिंघवी यांनी उपस्थित केला.
पक्षाचा एक सदस्य म्हणून नेत्याविरोधात आवाज उठवणं हा अधिकार संबंधिताला आहे. सर्वोच्च नेत्याविरोधात आवाज उठवणं म्हणजे बंडखोरी ठरत नाही, अपात्रता ठरत नाही. जर संबंधित पक्षातला एखादा नेता बहुमताच्या जोरावर आपल्या नेत्याला आव्हान देऊ इच्छित असेल तर त्याला पक्षांतर बंदी कायद्याचा रोख का असावा??, असा सवालही हरिश साळवे यांनी उपस्थित केला.


# अमेरिकन डॉक्टरांवर विश्वास नाही!

## २६ तासांची फ्लाईट, वैद्यकीय उपचारांसाठी १ कोटी खर्चून मुलांनी आईला भारतात आणले

आधुनिक केसरी न्यूज

बंगळुरू : भारतात योग्य उपचार होणार नाहीत. इथे जागतिक दर्जाच्या सुविधा, उपचार मिळत नाहीत, असे म्हणत अनेकजण वैद्यकीय उपचारांसाठी परदेशी जातात. मात्र आता परिस्थिती बदलू लागली आहे. आता अमेरिकेतील लोक उपचारांसाठी भारतात येऊ लागले आहेत. बंगळुरूची एक ६७ वर्षीय महिला अमेरिकेतून चेन्नईला पोहोचली. या महिलेला हृदयाशी संबंधित गंभीर आजार आहे.
अमेरिकेतून महिलेला उपचारांसाठी चेन्नईला आणण्यात आले. त्यासाठी २६ तास प्रवासात गेले. एअर ॲम्ब्युलन्सने महिलेला भारतात आणण्यात आले. वैद्यकीय उपचारांसाठी करण्यात आलेले हे सर्वाधिक मोठे ॲरोमेडिकल इव्हॅक्युएशन आहे. अमेरिकेतील उपचारांवर महिलेची मुले समाधानी नव्हती. त्यामुळे १ कोटी खर्च करून त्यांनी आईला भारतात आणले.
महागडे उपचार परवडणारे अनेक जण अमेरिका आणि युरोपियन देशांमध्ये जातात. या देशांमध्ये उपचारांच्या उत्तम सुविधा असल्याचे मानले जाते. मात्र हळूहळू लोकांची मानसिकता बदलू लागली आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील मेडिकल टुरिझम वाढू लागले आहे. परदेशांतील नागरिक मोठ्या संख्येने भारतात वैद्यकीय उपचारांसाठी येतात.
चेन्नईत उपचारांसाठी आलेल्या महिलेनं २६ तासांचा प्रवास केला. तिला भारतात आणण्यासाठी १,३३,००० (एक कोटी रुपयांहून अधिक) इतका खर्च आला. त्यात दोन सुपर-मिडसाईझ जेटदेखील सहभागी होते. रुग्णाची अवस्था पाहून हे दोन जेट सहभागी झाले होते. आता महिलेच्या हृदयावर शस्त्रक्रिया सुरू आहे. महिला इंदिरानगरची रहिवासी आहे. गेल्या काही वर्षांपासून त्या मुलांसह ओरेगॉनमध्ये वास्तव्यास होत्या. त्यादरम्यान त्यांना हृदयविकाराचे निदान झाले. त्यानंतर अमेरिकेतच त्यांच्यावर उपचार सुरू होते.
अमेरिकेत उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधा पुरेशा नसल्याचे महिलेच्या कुटुंबीयांच्या लक्षात आहे. त्यामुळे त्यांनी एअरलिफ्टचा निर्णय घेतल्याचं एअर ॲम्ब्युलन्स सर्व्हिस कंपनी आयसीएटीच्या सहसंस्थापिका आणि संचालिका डॉ. शालिनी नलवाड यांनी सांगितले. रविवारी सकाळी ओरेगॉनमधील बंदर परिसरातून एअरलिफ्टची सुरुवात झाली. महिलेला लीगेसी गुड समॅरिटन मेडिकल सेंटरहून पोर्टलँड इंटरनॅशनल एअरपोर्टला हलवण्यात आले. तिथे तिला सुपर मिडसाईझ प्रायव्हेट जेट चॅलेंजर ६०५ मध्ये ठेवण्यात आले. या जेटमध्ये आयसीयू तयार करण्यात आले होते.
फ्लाईंग आयसीयूमध्ये तीन डॉक्टर आणि दोन वैद्यकीय पथके होती. ते सातत्याने रुग्णावर लक्ष ठेवून होते. साडे सात तासांत जेटने रेकजाविक एअरपोर्ट गाठले. तिथे जेटमध्ये इंधन भरण्यात आले. तिथून हे जेट तुर्कस्तानातल्या इस्तंबूलला पोहोचले. तिथे वैद्यकीय आणि उड्डाण कर्मचारी बदलले. मात्र बंगळुरूतील डॉक्टर रुग्णालयाच्या देखरेखीसाठी कायम राहिले. त्यांना बदलण्यात आले नाही.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# टागोरांचे भावविश्व संपन्न करणाऱ्या दोन स्त्रिया

आधुनिक केसरी

रवींद्रनाथ टागोर म्हटले की समोर येते ती पांढरी शुभ्र दाढी असलेली भव्य चेहऱ्याची व्यक्ती. त्यांनी लिहिलेले 'जनगणमन' आठवते. टागोर म्हटले कीत्यांच्या 'गीतांजलीला' मिळालेला नोबेलपुरस्कार आठवतो. टागोर म्हटले की त्यांचे शांतिनिकेतन आठवते. टागोर हे महान गीतकार आणि संगीतकार. त्यांनी इंग्रज सरकारला'सर 'ही पदवी परत केल्याचे आठवते. आणि आठवतात अशाच साऱ्या अनेक गोष्टी. बंगाली माणसाच्या घराघरात आणि मनातमानाचे स्थान असलेले हे व्यक्तिमत्व. पण त्यांच्या तरुणपणातील एक अधुरी प्रेमकहाणी आपल्याला फारशी माहिती नसते. आणि तिचा संबंध आपल्या महाराष्ट्राशी आणि मराठी मुलीशी आहे.

आत्माराम पांडुरंग तर्खडकर किंवा तर्खड हे त्या काळातील मुंबईतील प्रसिद्ध डॉक्टर आणि समाजसुधारक. त्यांच्यावर बंगालमधील केशवचंद्र सेन यांचा प्रभाव होता. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन तर्खडकरांनी मुंबईत प्रार्थना समाजाची स्थापना केली. या स्थापनेच्या वेळी त्यांचा उद्देश होता, तो म्हणजे समाजातील जातीभेद दूर करणे, मुलींना शिक्षणासाठी उत्तेजन देणे, बालविवाह रोखणे आणि विधवा पुनर्विवाहास उत्तेजन देणे. तर्खड कुटुंबीय हे उच्चशिक्षित होते. देशविदेशातील अनेक विद्वान आणि थोर व्यक्तींशी त्यांचा संबंध होता. टागोरांना जेव्हा पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवायचे ठरले तेव्हा त्यांना मुंबईत राहत असलेल्या या तर्खडकर कुटुंबात पाठवण्यात आले. त्यांना इकडे पाठवण्यात त्यांचे थोरले बंधू सत्येंद्रनाथ यांची प्रमुख भूमिका होती. कारण सत्येंद्रनाथ आणि आत्माराम तर्खडकर यांचे संबंध. इंग्लंडला जाण्यापूर्वी इंग्रजी बोलणे आणि तेथील रीतिरिवाज शिकण्यासाठी या तर्खड कुटुंबात राहण्याचा त्यांना उपयोग होईल असे सत्येंद्रनाथांना वाटले. आणि रवींद्रनाथ मुंबईला या तर्खड कुटुंबात दाखल झाले. आत्माराम पांडुरंग यांची दुसरी मुलगी अन्नपूर्णा उर्फ अना ही त्या वेळी नुकतीच इंग्लंडमधून परतली होती. तिचे वय साधारण वीस वर्षांचे. आणि रवींद्रनाथ हा तरुण बंगाली तरुण अवघा १७ वर्षांचा. अना त्यांना इंग्रजी आणि इंग्रजी शिष्टाचार शिकवू लागली. हा देखणा तरुण बंगाली मुलगा तिला आवडला. आणि नकळत ती त्यांच्या प्रेमात पडली. रवींद्रांवर पण तिच्या प्रेमाने जादू केली होती. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## नेहमी आनंदाची भावना असावी

आधुनिक केसरी

आपल्या मनात, आपण आपली नियोजित, अपेक्षित ध्येये गाठली की आपल्याला शांती आणि आनंद मिळायला सुरुवात होते. अनेकांच्या बाबतीत दुर्दैवाने असे कधीच होत नाही, कारण शांतता हे गंतव्यस्थान नाही, शांतता हा मार्ग आहे, हेच समजून घेतले जात नाही. हे सत्य विसरून आपण  स्वतःलाच गोंधळात टाकत राहतो आणि दैनंदिन जीवनात आपली मनःशांती आपण गमावून बसतो. कोणाचेही जीवन परिपूर्ण नसते, त्यामुळे ते आपल्यासाठीही सोपे आणि सरळ नसते. आपण हे सत्य स्वीकारले पाहिजे आणि आपले आयुष्य आणखी गुंतागुंतीचे करणे थाबविले पाहिजे. अर्थात, काही कारणे, समस्या आणि काही त्रासदायक अनुभव आपल्याला शांती मिळण्यापासून रोखत असतात. आपल्याला फक्त त्यांना ओळखण्याची आणि त्यांच्या विरोधात धैर्याने लढण्याची गरज असल्याचे समजून आणि शिकून घेतले पाहिजे. मनःशांती, ज्याचे वर्णन आंतरिक शांतता म्हणून देखील केले जाते, ते शांततेच्या अंतर्गत स्थितीचा संदर्भ आपल्याला देत असते. जेव्हा आपल्याला मनःशांती मिळते तेव्हा आपल्याला जीवन अधिक आनंददायी वाटू लागते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आंतरिक शांततेची भावना संपूर्ण समाधान आणि आनंदाची भावना वाढवू शकते. शिवाय, एक आरामशीर आणि शांत दृष्टीकोन आपल्याला जीवनातील अनेकदा अनेकप्रकारे आपल्याच सर्वांगीण विकासासाठी मदत करू शकतो. मनःशांती मिळवणे वाटते तितके आव्हानात्मक नाही. केवळ त्याचा प्रारंभ करण्यासाठी काही महत्वपूर्ण बाबी अभ्यासणे गरजेचे असते. दैनंदिन जीवनातील मागण्यांमुळे तणाव आणि इतर भावनिक गडबड होऊ शकते, यात काही प्रश्नच नाही, विशेषतः जेव्हा आपण कठीण परिस्थितीतून जात असतो तेव्हा त्याचा आपल्याला अनुभव येतो.



आधुनिक केसरी

## श्वास खेळे जैसा | निजधामी ||

उंबऱ्याशी जीव | घुटमळे आज ||
देहावरी साज | चढविला ||१||

आत्मशुध्दीसाठी | केला न प्रयास ||
घेतला न ध्यास | सत्कर्माचा ||२||

नरजन्मासठी | निष्काम ते पुण्य ||
तोचि खरा धन्य | जाण जीवा ||३||

आत्मा-परमात्मा | अद्वैत जाणले ||
द्वैतही निमाले | जन्माचे ह्या ||४||

आता न राहिला | उंबरा तो कैसा ||
श्वास खेळे जैसा | निजधामी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी

**लज्जागुणौघजननीं जननीमिवस्वा**
**मत्यन्तशुद्धहृदयामनुवर्तमानाम्।**
**तेजस्विनः सुखमसूनपि सन्त्यजन्ति**
**सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम् ।।**

**अर्थ :** ज्यांना सत्यव्रत हेच व्यसन आहे, असे तेजस्वी लोक सहजच प्राणत्याग करतात, पण लज्जा गुणास उत्पन्न करणा-या, अत्यंत विशुद्ध हृदयाच्या, आपल्या मातेसमान संरक्षित अशा प्रतिज्ञेचा त्याग करत नाहीत. सत्यव्रती जनांचे आचरण कसे आदर्श असते, या विषयी कविराज भर्तृहरींनी येथे सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# भगवंताशिवाय शाश्वत सुख कोणीही देऊ शकत नाही

आधुनिक केसरी

**तुका म्हणे माझें हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें।।**
**- संत तुकाराम**
**(सार्थ श्री तुकाराम गाथा, अभंग. क्र.१४, धार्मिक प्रकाशन संस्था)**

संत तुकाराम महाराजांचे 'हेचि' सुख आणि समर्थांचे 'हेचि' सुख यात काहीच भेद नाही. 'हेचि' म्हणजे 'भगवंता खेरीज अर्थात भगवंताशिवाय शाश्वत सुख कोणीही देऊ शकत नाही' असे समर्थांचेच नव्हे तर सर्व संतांचे सांगणे आहे. सर्वसुख म्हणजे ब्रह्मानंद. समर्थ आपल्याला साधना कशी करावी हे ३८ ते ४२या पाचश्लोकातून सांगत आहेत. उत्कट भक्तीने साधना करावी (३८) चंचलतेचा त्याग करावा (३९) वाईट कल्पना सोडून द्याव्या (४०) निष्ठा अणि एकाग्रता साधावी (४१)आणि आपल्या आराध्य देवतेवर पूर्ण विश्वास ठेवावा (४२). व्यवहारातील किंवा परमार्थातील प्रगतीसाठी वरील पंचसूत्री अत्यावश्यक आहे. प्रत्येक पायरीवरील आपली निष्ठा पाहून देव आपली कधीही उपेक्षा करीत नाही.

'बहुतांपरी' असा शब्द समर्थांनी इथे योजिला आहे. प्रपंच म्हटला की किमान पाच गोष्टी लागतात पण संन्यास घ्यायचा म्हटला तर कशाचीही गरज लागत नाही. सामान्य मनुष्य निव्वळ प्रपंची नाही तर जलातील माशांप्रमाणे ह्या भवसागरात आकंठ बुडालेले जलचर आहे. डबक्यातील बेडकाला ज्याप्रमाणे आपले 'डबके'च मोठे वाटते तसे सामान्य मनुष्याला देखील आपला प्रपंच, आपला संसार, आपली सुखदुःखे हीच तितकी खरी आणि मोठी वाटतात. त्यातून मिळणारे सुख (?) कधीही नष्ट होऊ नये म्हणून त्याची सतत धडपड चालू असते, मग त्यासाठी जो दिसेल तो मार्ग आचरण्याचा तो प्रयत्न करु लागतो. आज हा देव तर उद्या ती देवी, आज काळा राम तर उद्या गोरा राम, आज पांढरा मारुती तर उद्या पत्र्या मारुती, आज मथुरा तर उद्या काशी, आज महादेव तर उद्या महालक्ष्मी. रोज गंतव्य स्थान बदलून आपण कधीही इच्छितस्थळी पोहचणार नाही, तर निश्चित ध्येय आणि अचूक मार्ग ठरवून न थकता मार्गक्रमण करीत राहणे गरजेचे... असे केले  तरच मनुष्य योग्य वेळीआपल्या गंतव्य स्थानी पोहचू शकेल. शेतात विहीर खणायची असेल तर अनेक ठिकाणी छोटे छोटे खड्डे खणून विहीर कधीही पूर्ण होणार नाही आणि तिला कधी पाणी लागणार नाही' हे आपण आधीच्याश्लोकांत बघितले आहे. परमार्थ साधण्याचा मार्ग प्रत्येकाच्या आवडीनुसार भिन्न असू शकतो पण 'गंतव्य' स्थान मात्र एकच असले पाहिजे, बरोबर ना ? कुणाला भक्तिमार्ग आवडेल तर कोणाला ज्ञानमार्ग, कोणाला कर्ममार्ग आवडेल तर आणखी वेगळा ? प्रत्येकाची रीत निराळी. भक्तिमार्ग धरणारे सुद्धा एकाच पद्धतीने भक्ती करतील असे नाही. कोणी रामाची पूजा करेल तर कोणी कृष्णाची, कोणी षोडशोपचारे पूजा करेल तर कोणी मानसपूजा करेल, कोणी शंकराचा जप करेल तर कोणी रामाचा तर कोणी देवीचा. बरं रामाचा जप करणारे एकाच राममंत्राचा जप करतील असे नाही त्यात सुद्धा विविधता आढळते. प्रत्येक व्यक्तीगणिक 'भाव' मात्र बदलत असतो. भक्तिमार्गात भावाला अनन्यसाधारण महत्व आहे. 'भाव तसा देव' किंवा 'भक्ति तितकी प्राप्ती !!'. समर्थांनी अनेक शब्दांबद्दल एक शब्द वापरुन 'बहुतांपरी'चे  अनेक अर्थ विशद केले आहेत.

**"म्हणौनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥"** (दा.०४.०८.३१)

आजच्या काळात अध्यात्माला अनेक धुमारे फुटलेले आहेत असे जाणवते. अनेक 'भोंदू' (यांना संत कसे म्हणावे ?) भगवंतांचे, त्याच्या नामाचे महत्व न वाढवता आपल्याच नावाचा उदोउदो करताना आपल्याला दिसतात. समाजाला खऱ्या सुखाचा मार्ग न दाखविता त्यास भौतिक सुखात कसे गुंतवून ठेवता येईल याच्या नवनवीन क्लुप्त्या शोधून त्याला खऱ्या सुखापासून चार हात दूर ठेवले जात आहे. ह्यामध्ये आजचे तथाकथित 'भोंदू बाबा' किंवा 'माता'च सामील आहेत असे नाही तर काही 'पंचतारांकित' मंदिरे सुद्धा यात सामील आहेत. 'खऱ्या सुखाच्या' शोधात असणारा सामान्य माणूस मात्र यात पुरता भरडला जात आहे. समर्थांच्या काळात सुद्धा असेच भोंदू साधू असावेत. म्हणून त्यांनी 'बहुतांपरी' असा चपखल शब्द योजून अनेक परी आपल्याला दाखवून आपल्याला सतर्क केले आहे. समर्थ सांगतात की इतके सारे आधीही होते, पुढेही असेल पण मना ! तू मात्र फक्त त्या 'आत्मारामा'चीच पूजा कर, त्याचाच मार्ग आचर.

# भक्ती काय चीज असते !

आधुनिक केसरी

आज मी तुम्हाला एक अद्भुत गोष्ट सांगणार आहे. गोष्ट आहे सावता माळ्याची. मग तुम्हाला कळेल की भक्ती काय चीज असते !

सावता माळी हा शेती करून पोट भरणारा एक भक्त होता. त्याचा पांडुरंगावर व पांडुरंगाचा त्याच्यावर खूपच लोभ होता. सोलापूर जिल्ह्यातील अरणगावी तो रहात असे. सावता माळी अभंग रचनाही करीत असे. काशिबा गुरव हे त्यांचे अभंग लिहून ठेवत असत. आज फक्त 37 अभंगच ज्ञात आहेत आपल्याला त्यांचे. पण तेवढेही पुरेसे आहेत भक्ती शिकायला. त्या अभंगांचं सार हेच की 'प्रचंड उत्कट चिंतन केलं की भगवंत भेटतो.'

तर, हा सावता माळी त्याच्या शेतात गव्हाचं पिक घेत असे. एके वर्षी भरपूर पिक आलं होतं. त्याच सुमारास पंढरपूर कडे जाणारी वारकऱ्यांची दिंडी त्याच्या शेतावरून जात असताना त्याने थांबवुन त्यांना भोजन घातलं. सगळे भोजनाने खूश तर झाले. पण मनोमन दुःखी होते कारण त्या वारकऱ्यांच्या गावी दुष्काळाने पिकं नष्ट झालेली होती. तेव्हा त्यांनी सावता माळ्याला विनंती केली की आम्हाला थोडं थोडं धान्य द्या ना घरी न्यायला. सावता माळ्याने बायकोला विचारलं तेव्हा बायको म्हणाली की यांना धान्य वाटून सगळंच संपेल धान्य. मग आपण वर्षभर काय खायचं. तेव्हा तो तिला जे म्हणाला त्याने तिच्या डोळ्यात पाणीच आले. तो म्हणाला, "हे बघ, जर निर्जीव जमिनीत एक दाणा पेरला तर पांडुरंग आपल्याला शेकडो दाणे देतो, तर त्याच्या जिवंत भक्तांच्या पोटात आपण दाणे पेरले तर तो आपल्याला उपाशी ठेवेल का ?" सर्वांना आनंदाने धान्य वाटणाऱ्या या दांपत्याला पहायला व हसायला सारा गाव लोटला होता. लोकं नको नको ते बोलत होते. कुटाळक्या, चेष्टा, टोमणेगीरी. पण हे आपले शांत होते. सारं धान्य वाटून संपलं. दुसऱ्या दिवशी पुन्हा शेत नांगरायला सुरवात केली सावत्याने. पण त्याच्याकडे पेरणी करायलाही धान्य शिल्लक नव्हते. गावात उसनं मागू गेला तरी कुणी दिलं नाही. एकाने मस्करीने त्याला भरपूर कडू भोपळ्याच्या बिया दिल्या पेरायला व म्हणाला की हे कडू भोपळे सकाळ संध्याकाळ भाजी बनवुन वर्षभर रोज खायला तुला पुरतील. सावताने त्या बिया घेतल्या व खरोखर पेरणीला सुरवात केली. सारा गाव हसत होता. कारण कडु भोपळा तर गुरं पण खात नाहीत ! त्यावर्षी सावताच्या शेतात एक माणूस आत बसेल एवढे मोठे मोठे कडु भोपळे लागले वेलींना. साऱ्यांना आश्चर्य वाटले की असं कधी होतं का. पण मग त्यावरूनही ते सावताची मस्करी करीत असत रोजच. कडु भोपळ्यांची राखण करण्याची जरूरच नव्हती कारण कोण चोरणार ते. पण तरीही रोज सावता शेतावर जाऊन राखण करत भजन करीत असे पांडुरंगाचं. थोडी कुठे मोल मजुरी करून दुसऱ्यांच्या शेतावर, मग घरी येत असे. होता होता लोक विचारू लागले की तू हे भोपळे एवढे कुठे साठवणार. एके दिवशी भाजी करायला सावताने एक भोपळा घरी आणला. सावताच्या बायकोने भोपळा चिरला आणि काय आश्चर्य, संपूर्ण भोपळा तयार गव्हाच्या टपोऱ्या दाण्यांनी भरलेला होता गच्च व ते सगळे गहू सांडले सारवलेल्या जमिनीवर. सावताचे डोळे पाणावले. "किती रे देवा तुला काळजी माझी." मग दुसऱ्या दिवशी पण भोपळ्यातुन गहू निघाले. मग मात्र ही बातमी सगळ्या गावात वाऱ्यासारखी पसरली. सगळे जण हा चमत्कार बघायला येऊ लागले. कुणी भोपळा चोरून नेऊन चिरला तर त्यात गहू निघत नसे. ही बातमी त्यावेळेच्या मुसलमान राजाच्या कानावर गेली व तो स्वतः आला व सावताला भोपळा चिरून दाखवायला सांगीतला. भोपळ्यातले गहू बघून तो मुसलमान राजाही गहिवरला व नमस्कार करून म्हणाला, "धन्य तुमची भक्ती!". यानंतर सावता अधिकच विरक्त झाला. आपलं सर्वस्व देवाला दिलं की देवावरच भक्तीचं कर्ज चढतं. भक्तांचा चरीतार्थ चालवण्यासाठी देवांचाही देव करीतो भक्तांची चाकरी. आपण सगळे कडु भोपळेच असतो. कुणा सावताचं भजन वा ज्ञान कानावर पडलं की आपल्या हृदयात भक्तीचे गव्हाचे दाणे तयार होत असतात. हा सगळा ना, नामाचा महिमा आहे.

# सिल्लोड तालुका कृषी अधिकारी कार्यालय रामभरोसे

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**सिल्लोड :** ग्रामीण भागातील शेतीमधील उत्पादन वाढीसाठी शासनस्तरावरून आवश्यक ती मदत शेतकऱ्यांना व्हावी या उद्देशाने शासनाने कृषी विभागाच्या वतीने जिल्ह्यात व तालुक्यात कृषी अधिकारी कार्यालयाची निर्मिती केली आहे. शेतीशी आवश्यक असलेल्या शासकीय सोयी-सुविधा पुरविणे, शासनाच्या वतीने लागू असलेल्या शेतकरी हिताच्या विविध योजना सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी बी-बियाणे व रासायनिक खतांचे मुबलकपणे व्यवस्थापन व्हावे या उदात्त हेतूने उभ्या केलेल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयांपैकी शेतकऱ्यांना सदैव टाळाटाळी साठी चर्चेत असणारे सिल्लोड शहरातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय हे सध्या अक्षरशः रामभरोसे झाले आहे. दैनिक आधुनिक केसरीच्या पथकाने कार्यालयात जाऊन पाहणी केली असता शिपाई व अन्य सर्व कर्मचाऱ्यांसहित तालुका कृषी अधिकारी पर्यंत कुणीही कार्यालयात हजर नसून कार्यालय मात्र रामभरोसे वाटत आहे... मला पहा आणि पान फुल वाहा अशी प्रचितीच जणुकाही या कार्यालयात गेल्यानंतर झाली. कर्मचाऱ्याना संपर्क केला असता ते मात्र दुरून डोंगर साजरे असल्यासारखेच दाखवीत आहेत.

सध्या ग्रामीण भागांतील प्रत्येक शेतकरी हा शेतीकामाच्या मशागतीत कामाला लागलेला आहे. आणि अशातच त्याला कृषी खात्याशी निगडीत कामासाठी तालुक्याच्या कृषी अधिकारी कार्यालयात यायची गरज भासते मात्र याठिकाणी आल्यानंतर सुद्धा कुणीच कर्मचारी हजर नसल्याने त्यांची भ्रमनिराशा होते काही नागरिकांनी तर आपल्या प्रतिक्रिया देतांना सांगितले की आम्हांला या अशा परिस्थितीला वर्षभर सतत सामोरे जावे लागते. मग एवढे मोठे कार्यालय असून त्याठिकाणी एकही कर्मचारी हजर राहत नसेल तर मग कार्यालयाचा अट्टहास का? शासनाचा पगार घ्यायचा तरी कशाला? असे असंख्य प्रश्न सर्वसामान्य नागरिकांसमोर आणि शेतकरी वर्गांसमोर उभे राहत आहेत.





# खो-खो खेळाच्या विकास आणि प्रसारासाठी सर्वतोपरी मदत करणार : समीर मुळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नुकतीच चौथी खेलो इंडिया युथ गेम्स राष्ट्रीय खो खो स्पर्धा पंचकुला (हरियाणा) येथे पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्र खो-खो संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. महाराष्ट्राच्या संघात औरंगाबादची मयुरी वसंत पवार हिने लौकिकास्पद खेळ करून राज्याला 'सुवर्णपदक' मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. औरंगाबाद जिल्ह्याची सुवर्णकन्या कु. मयुरी वसंत पवार हिने वेळोवेळी मिळविलेल्या यशानिमित्त दि. औरंगाबाद खो-खो असोसिएशनच्या वतीने तिचा आज भव्य सत्कार संघटनेचे अध्यक्ष समीरभैया मुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

अखिल भारतीय विद्यापीठ खो-खो स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने 27 वर्षानंतर 'कास्यपदक' मिळविले. या विजयी संघात औरंगाबाद जिल्ह्यातील खेळाडू कु. पूजा अशोक सोळंके व कु. सुजल जाधव या खेळाडूंनीही सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. त्यांचाही सत्कार यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस ॲड. गोविंद शर्मा यांच्या शुभहस्ते करण्यात आला. तसेच ॲड. गोविंद शर्मा यांची भारतीय खो-खो संघ निवड समिती सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचाही सपत्नीक सत्कार करण्यात आला आणि औरंगाबाद येथे एप्रिल महिन्यात खो-खो पंच परीक्षा पार पडली. त्यामध्ये विजय बोबडे, प्रबोधन बनसोडे, राजपाल निकाळजे, वरद कचरे, चेतन गायकवाड, महेश कुंभकर्ण, नवनाथ राठोड, महेश भावसार, प्रफुल्ल कुलकर्णी, समीर शेख, दत्तू अहिरे, कु. शांभवी पाटील, कु. कल्याणी सोनवणे, कु. पूजा सोळंके, सौ. चंचल जाधव-बडदे, सौ. तेजस्वी बाहेती, उमेश साबळे, सौरभ गोसावी हे पंच म्हणून उत्तीर्ण झाले. त्यांचाही सत्कार यावेळी संघटनेच्या वतीने करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस गोविंद शर्मा, सौ. विजया शर्मा, औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन सचिव विकास सूर्यवंशी, सहसचिव अभयकुमार नंदन, मोहन आहिरे, कोषाध्यक्ष श्रीपाद लोहकरे, मनोज गायकवाड, योगेश सोळुंके, सुमंत तांबडे, वसंत पवार, सौ. लता पवार आणि छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था जनसंपर्क अधिकारी संजय पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बनकर यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आली.

# बिडकीनला उत्कृष्ट पोलिस ठाणे पुरस्कार जुन 2022 सन्मान

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकीन :** औरंगाबाद ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालय यांच्या वतीने आयोजित उत्कृष्ट पोलिस ठाणे व उत्कृष्ट पोलिस अधिकारी 2022 हा पुरस्कार बिडकिन पोलिस ठाणे यांना मिळाला आहे. आज औरंगाबाद पोलीस अधीक्षक ग्रामीण यांच्या हस्ते बिडकिन पोलिस ठाण्याचे कर्तव्य दक्ष सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या उल्लेखनीय कामामुळे बिडकिन पोलिस ठाण्याला औरंगाबाद ग्रामीण जिल्ह्यातील उत्कृष्ट पोलिस ठाणे पुरस्कार जुन 2022 हा जाहिर करण्यात आला आहे. औरंगाबाद पोलिस अधीक्षक मनीष कलवानीया व पोलीस उपअधीक्षक पवन बनसोड यांच्या हस्ते सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांना पुरस्कार प्रदान करत सन्मान करण्यात आला आहे.

यावेळी सर्व पोलिस ठाणे बिडकिन अधिकारी व कर्मचारी व सर्व टिमचे मनःपुर्वक अभिनंदन व शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व स्तरातून या मिळालेल्या पुरस्कारांची कौतुक करत शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# धुळे तालुक्यात चोरट्यांचे थैमान

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** तालुक्यातील फागणे या गावात एचडीएफसी बँकेच्या एटीएम मशीन फोडण्याचा डाव चोरट्यांचा अपयशी ठरला आहे. फागणे गावात महामार्ग लगत असलेल्या एचडीएफसी बँकेचे एटीएम कोणी येत असल्याचा संशय बाळगल्याने चोट्यांनी एटीएम न फोडता पळत काढला आहे. घटनेचा थरार सीसीटीव्ही कॅमेरे देखील कैद झाला आहे.

मध्यरात्री घडलेल्या घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने धाव घेतली होती. एलसीबी चे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी ही घटनेची पाहणी केली तसेच ठसे तज्ञ पथक देखील येऊन त्यांनी पाहणी केली. तर दुसरीकडे कपडणे गावात ATM फोडून साडेपाच लाखांची रोख रकम चोरट्यांनी पळवून नेली आहे.

**ग्रामीण भागातील एटीएमवर चोरट्यांची वक्रदृष्टी**

धुळे जिल्ह्यात दोन ठिकाणी चोरट्यांनी मध्यरात्री ते पहाटे च्या दरम्यान एटीएमला लक्ष केल्याची घटना उघडकीस आली. मिळालेल्या माहितीनुसार धुळे जिल्ह्यातील फागणे गावातील एका खासगी कंपनीचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला असल्याची माहिती समोर आली आहे.



# सावळदबारा कृषी विभागामार्फत कुपोषित बालकांच्या कुटुंबास भाजीपाला किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.१९ रोजी सोयगाव तालुका कृषि अधिकारी एस.बी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक मानसिंग भोळे, कृषी सहायक अर्जुन सुरडकर व आत्मा पर्यवेक्षक अमोल महाजन यांनी आत्मा योजनेअंतर्गत सावळदबारा येथील अंगणवाडी कार्यक्षेत्रात असणाऱ्या कुपोषित बलकांच्या कुटुंबियांसाठी भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत आहे.

सदरील योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पोषणमूल्याअभावी होणारे कुपोषण कमी करणे, पोषणयुक्त - संतुलित व सुरक्षित अन्नाचा पुरवठा करणे या प्रकारची उद्दिष्टे साध्य केली जात आहेत. सदरील योजनेअंतर्गत तालुक्यातील 833 कुपोषित बालके असलेल्या कुटुंबांची निवड गावातील अंगणवाडी सेविका यांचे मार्फत करण्यात येत असून प्रथम टप्प्यात सोयगांव तालुकयास 333 भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत आहे.

तालुक्यात सावळदबारा येथील कुपोषित बलकांच्या कुटुंबीयांना भाजीपाला किट अंगणवाडी सेविका उषाताई उमाळकर, रेखाताई शातांराम खराटे, विमलबाई गुंजे, कपाटेताई, लताबाई गोंडबे यांच्या हस्ते आत्मा यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रा. जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते), उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, दिपक मानकर, सुर्यवंशी, कुपोषित बालकांचा आई, ग्रामस्थ व सर्व अंगणवाडी सेविका, मद्तीस उपस्थित होते.



## उष्णतेची लाट अभूतपूर्व कशी ?

आधुनिक केसरी

दोन महिन्यांपूर्वी फ्रान्सने उच्च तापमानाचा मे महिना अनुभवला. तर जून महिन्यात स्पेन, इटली आणि इतर देशांवरही उच्च तापमानाचे संकट ओढवले. जुलै महिन्यात पूर्व युरोपचा काही भाग व पोलंडमध्ये तापमान उच्च पातळीवर आहे. इंग्लंडमध्ये तापमानवाढीमुळे राष्ट्रीय आणीबाणी घोषित करावी लागली. संपूर्ण युरोपमध्येच तापमान प्रचंड वेगाने वाढत असून अनेक देशांमध्ये वणवे पेटले आहेत. उन्हाळ्याचे दोन महिने बाकी असतानाच तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे संपूर्ण युरोप होरपळला आहे. जगभरातील सर्वसामान्य तापमान हे गेल्या काही दशकांमध्ये एक अंशाने वाढले आहे आणि त्याचा परिणाम म्हणजे हवामानात मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत. उष्णतेची लाट येणे ही नवीन गोष्ट नसली तरीही हवामान अभ्यासकांच्या मते जगभरात वाढलेले तापमान हे उष्णतेच्या लाटेची तीव्रता वाढवत आहे. उष्णतेच्या लाटेचे प्रमाणदेखील वाढत आहे. पोर्तुगाल, स्पेन, उत्तर आफ्रिका यांच्याकडून येणारे उष्ण वारे प्रचंड दाबासह युरोपच्या उत्तरेकडील भागात आल्यास उष्णतेची लाट वाढते. त्यामुळे तापमानात वाढ होऊन आर्द्रता वाढते. यावर्षी मात्र सहारा वाळवंटाकडून आलेल्या उष्ण वाऱ्यामुळे ही उष्णतेची लाट आली आहे. हवामानात होणारे बदल हे उष्णतेच्या लाटेसाठी कारणीभूत असले तरीही हे बदल घडवून आणण्यात माणसाचा मोठा वाटा आहे. मानवी कृत्यामुळेच हवामानात बदल होत असून त्याचे परिणामही माणसांवरच होत आहे, हे युरोपमधील उष्णतेच्या लाटेने दाखवून दिले आहे. मात्र, त्यानंतरही माणूस त्याच्या वर्तनात बदल करताना दिसून येत नाही. घरी, कारखाना आणि वाहतुकीसाठी केला जाणाऱ्या तेल, गॅस आणि कोळशाच्या वापरामुळे हवामानात झपाट्याने बदल होत आहेत. युरोपमधील वर्ल्ड वेदर ॲट्रिब्युशन समूहाने वैज्ञानिकरित्या उष्णतेच्या लाटेमागची कारणे शोधली तेव्हाही वातावरणातील बदल आणि तापमान वाढीसाठी मानवी कृत्य कारणीभूत असल्याचे त्यांना लक्षात आले. जगभरातील वाढणाऱ्या, कमी होणाऱ्या तापमानाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. भारतातही यावर्षी उष्णतेच्या लाटेचे प्रमाण गेल्या १०० वर्षांच्या तुलनेत प्रचंड वाढले होते. विशेषकरून महाराष्ट्रात एरवीच्या तुलनेत उष्णतेच्या लाटेंची संख्या वाढली होती. उष्णतेमध्ये होणारी प्रचंड वाढ म्हणजेच कमाल तापमानात पाच किंवा त्याहून अधिक अंशाने होणारी वाढ असेल, तर साधारण उष्णतेची लाट आली असे म्हणतात. आर्द्रता आणि वाऱ्याचा कमी वेग यामुळे देखील उष्णतेची लाट वाढू शकते. शहरातील रस्ते आणि इमारतीसहीत होणारे सिमेंटीकरण हे देखील उष्णतेच्या लाटेसाठी कारणीभूत ठरत असून त्याचे मोठे दुष्परिणाम घडून येतात. युरोपातील उष्णतेची लाट हे त्याचेच उदाहरण आहे. जुलै १९७७ मध्ये युरोपमध्ये सर्वोच्च ४८ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले होते. तर जागतिक हवामान संस्थेनुसार २०१५-२०१८ ही वर्ष सर्वाधिक उष्ण होती. भविष्यात हवामानातील बदल आणि तापमान वाढ रोखण्यात माणूस यशस्वी झाला नाही तर युरोपमध्ये २०४० पर्यंत एक वर्षाआड अशी उष्णतेची लाट येतच राहील. एवढेच नाही तर पुढील काही वर्षात उष्णतेच्या लाटेत एक अंश किंवा त्यापेक्षा अधिकची वाढ झालेली दिसून येईल, असा इशाराही हवामान अभ्यासकांनी दिला आहे.



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

## रोज मरे त्याला कोण रडे

आधुनिक केसरी

**बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची त्यांच्याच चिरंजीवानी आणि नातवानी जी वाट लावली आहे. ती पहाता आता काय बोलावे कांहीच सूचत नाही आहे. राजकारणात एक राजकीय पक्ष चालवणारा पक्षप्रमुख एवढा भोळा भाबडा किंवा अनभिज्ञ कसा असू शकतो याचेच आश्चर्य वाटत असून आता या घडीला उध्दव ठाकरे यांची कीव येत आहे. उध्दव बाळासाहेब ठाकरे हे सध्या प्रचंड दबावाखाली असून त्यांची निर्णय क्षमताच संपलेली दिसत आहे.**

कसेही करून, काहीही करून राजन विचारे आणि विनायक राऊत यांना जर शिंदे गटात पाठवले किंवा घुसवले तरच कदाचित हे उठाव केलेले काही लोक परत शिवसेनेत म्हणजे उध्दव सेनेत येतील असे गंमतीने म्हणावे वाटत आहे. कारण संजय राऊत यांना तर पाठवणे अशक्य आहे. तरीही आमचे आदरनीय साहेब जरा राष्ट्रपती, उपराष्ट्रपती पदाचे निवडणूकीत बिझी होते. राष्ट्रपती पदाचे 18 तारखेला झालेल्या मतदानात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची मते फुटू नयेत यासाठी दक्षता घेण्यात साहेब मग्न होते.

आता सहा तारखेला उपराष्ट्रपती पदासाठी मतदान आहे, आणि लगेच मतमोजणी होईल. उद्या 21 तारखेला राष्ट्रपती पदाची मतमोजणी होईल. एवढी दक्षता घेऊनही दोन्ही कॉंग्रेस पक्षाची किमान एकवीस कमाल सव्वीस मते द्रौपदी मूर्मू यांना मिळाली आहेत. साधारणपणे झालेल्या 98% मतदाना पैकी 85 % मते श्रीमती द्रौपदी मूर्मू यांचे पारड्यात पडतील असा अनुमान आहे.

ईकडे उध्दव ठाकरे यांनी उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार ठरवण्यासाठी झालेल्या सतरा विरोधी पक्ष नेत्यांच्या बैठकी साठी संजय राऊत यांना पाठवले होते. आणि गोंधळून जाऊन अद्याप उध्दव ठाकरे यांनी ठोस निर्णय घेतलेला नाही. कोणाला मतदान करायचे याबाबत. पण त्यांचा मनोदय मार्गरिट अल्वा यांनाच पाठिंबा देण्याचा दिसतोय असे दिसताच बारा शिवसेना खासदार शिंदे गटात गेले. त्यांनी लोकसभा सभापती श्री ओम बिर्ला यांना पत्र देऊन त्यांची संमती घेतली आहे.

आता महाराष्ट्रभर हे बंडखोरीचे लोण पोहोंचले आहे. आज आणि उद्या सर्वोच्च न्यायालयाने शिंदे गटाच्या बाजूने कौल दिला तर मग गळतीला वेग मिळेल. तसे पाहता या शिवसैनिकांना काय किंवा कोणत्याही राजकीय नेत्याला कोणत्याच पक्षाचे काही पडलेले नसते. फक्त आपलं भवितव्य कोठे सुरक्षित आहे. कोणत्या पक्षाचे बरोबर किंवा नेत्या सोबत राहील्याने आपली आमदारकी खासदारकी शाबूत राहणार आहे हे गणित मांडून तसे पक्षांतर होत असते. घोडेबाजार हा शब्द मी वापरणार नाही पण तत्वासाठी कोणी ही पक्षांतर करत नाही हे सत्य आहे.

जसे हिंगोली लोकसभेचे आमदार आधी रड रड रडले आणि लगेच शिंदे गटात गेले. त्याबरोबर माजी आमदार, खासदार श्री सुभाष वानखेडे यांनी लगेचच उध्दव सेनेत घर वापसी केली. कारण तिकीट मिळण्याची



शक्यता वाढली. असे अतिशय मतलबी आणि आर्थिक व्यवहाराचे बाजूनेच फक्त विचार होतो. देशाचा, राज्याचा विचार फक्त नरेंद्र मोदी, अमित शाह, नितीन गडकरी, राजनाथसिंह, देवेंद्र फडणवीस यांनी आणि यांचे टीमने करायचा, बाकी हे दलबदलू फक्त मतदार संघात किती निधी मिळेल आणि आपले भत्ते, पगार कसा वाढता राहील एवढेच पाहतात. रोज शिवसेनेतून हे बाहेर पडले, ते बाहेर गेले एवढेच ऐकावे लागत आहे. संजय राऊत यांनी सामना मध्ये हकालपट्टीची बातमी छापून एक तळमळीचा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना बाहेर पडायला भाग पाडले, मजबूर केले. हे सर्व घडत असतांना उध्दवजी आणि युवराज आदित्य फक्त साहेबांची साथ आम्ही सोडणार नाही म्हणत जप करत बसले आहेत. भाजप, राष्ट्रवादी, आणि शिवसेनेचे नाराज मोठे नेते तमाशा बघण्याचा आनंद लूटत आहेत. उपराष्ट्रपतीपदासाठी आता एनडीएच्या जगदीप धनघड यांना पाठिंबा दिला तरी काही फरक पडणार नाही. कितीही माझ्या भात्यातले बाण गेले तरी धनुष्य माझ्याच जवळ आहे अशी केविलवाणी वल्गना उध्दवजींनी केली. आहो, धनुष्य आणि बाण दोन्ही जाणार आहे तुमचे हातुन. पक्ष, नाव, चिन्ह सर्व काही शिंदेंना मिळणार आहे.

दोन दिवसात सर्व स्वच्छ होईल. स्पष्ट दिसेल. आज नंतर मी शिवसेना, उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत या विषयावर फक्त एक शेवटचे विश्लेषण लिहून नंतर दुसरे राजकीय चांगले विषय हाताळीण, शिवसेना पुरान संपवणार. गेली दोन महिने हाच विषय हॉट होता. परंतू उध्दवजी एकही खेळी तज्ञासारखी खेळले नाहीत. भांबावलेले, गोंधळलेले, हतबल झालेले, हरलेले पाहावे लागते आहे. त्यामुळे आता रोज मरे त्याला कोण रडे म्हणतो आणि थांबतो. पण उध्दवजींना शुभेच्छा देतो आवर्जून, निदान तब्येत सांभाळा. संजय राऊत आणि साहेबांपासून सुरक्षित अंतर ठेवा. आणि आदित्यला राज्यशास्त्र विषयात पदवी घे आणि तोपर्यंत फक्त अभ्यास एके अभ्यास कर एवढेच सांगून, युवासेनेपासून ही थोडे दुर राहा म्हणून सांगा. गडगंज आहे आपले जवळ, त्यामुळे खाण्यापिण्याची ददात नाही आहे. सुखाने जगा.



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

## जागतिक बुद्धिबळ दिन

आधुनिक केसरी

**खेळ हा मानवी आयुष्याचा महत्त्वाचा घटक आहे. शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी मैदानी आणि बैठे दोन्ही प्रकारचे खेळ आवश्यक आहे. बैठे खेळात सर्वात लोकप्रिय आणि आवडता खेळ म्हणजे बुद्धिबळ. बुध्दीचा कस लावणारा आणि विचारशक्तीला चालना देणारा असा हा बुद्धिबळाचा खेळ कोणत्याही वयोगटातील व्यक्ती खेळू शकतील असा आहे. दरवर्षी 20 जुलै हा 'वर्ल्ड चेस ऑर्गनायझेशन' या आंतरराष्ट्रीय संस्थेचा वर्धापन दिवस 'जागतिक बुद्धिबळ दिन' म्हणून साजरा केला जातो. 'वर्ल्ड चेस ऑर्गनायझेशन'च्या जन्माआधी अनेक वर्षांपासून बुद्धिबळ खेळला जात आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे बुद्धिबळाचा प्रसार भारतापासूनच झाला होता.**

२० जुलै, १९४२ रोजी फ्रान्समधील पॅरिस येथे झालेल्या आठव्या ग्रीष्मकालीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये, फिड म्हणजेच जागतिक बुद्धीबळ फाउंडेशनची स्थापना झाली आणि २० जुलै, १९६६ पासून, आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिन फिडच्या स्थापनेचा सन्मान करण्यासाठी साजरा करण्यास सुरवात झाली. याच २० जुलै रोजी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिन साजरा करण्यासाठी युनेस्कोने प्रस्ताव दिला होता. संपूर्ण जगात सर्वत्र बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केल्या जातात. १८५१ मध्ये लंडनमध्ये पहिली आधुनिक बुद्धिबळ स्पर्धा झाली आणि ती जर्मन ॲडॉल्फ अँडरसनने जिंकली.

तंत्रज्ञानाचा वापर करून हा खेळ आता ऑनलाइन पद्धतीने देखील खेळला जातो. या माध्यमात देखील हा खेळ लोकप्रिय झाला आहे. ह्या खेळाला इतकी लोकप्रियता मिळण्या मागे कारण हेच आहे हा खेळ सर्वांना परवडेल असा आहे आणि त्याच बरोबर वय, लिंग, जात, शारीरिक क्षमता, भाषा याचे कोणतेही बंधन या खेळाला नाही. आज 'जागतिक बुद्धिबळ दिन' आहे. या निमित्ताने या खेळाशी निगडित असणाऱ्या काही उल्लेखनीय बाबी ज्या सर्व स्पर्धा परीक्षांसाठीही उपयुक्त आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत :

* जागतिक बुद्धिबळ महासंघ मुख्यालयः लॉझने, स्वित्झर्लंड
* जागतिक बुद्धिबळ महासंघ स्थापनाः 20 जुलै 1924, पॅरिस, फ्रान्स (8 व्या ऑलिम्पिक खेळांदरम्यान)
* जागतिक बुद्धिबळ महासंघाचे मुख्य कार्यकारी अधिकारीः जेफ्री डी. बोर्ग
*बुद्धिबळचा सर्वात जास्त वेळ खेळला जाऊ शकणारा खेळ आहे. यामध्ये ५,९४९ एवढ्या चाली आहेत.
*चेकमेट" हा शब्द "शाह मॅट" या अरबी शब्दापासून आला आहे.
*जर्मन डॉ. इमानुएल लस्करने २६ वर्षे आणि ३३७ दिवस विजेतेपद कायम राखले होते.
*युरोपमध्ये १०९० मध्ये आज आपण पहात असलेले आधुनिक चेसबोर्ड प्रथमच दिसले.
*११२५ मध्ये फोल्डिंग चेसबोर्डचा शोध लागला.
*आधी बुद्धिबळ खेळाडूंना "रुकीज" म्हणून ओळखले जात असे.
* पाचव्या शतकात भारतात हा खेळ 'चतुरंग' म्हणून खेळला जाट होता नंतर त्याचा प्रसार पर्शियात झाला.



अतिशय धीराने आणि संयमाने हा खेळ खेळावा लागतो. खरंतर हा फक्त खेळ नाही तर आपल्या रोजच्या दैनंदिन आयुष्यात देखील आपण कसे वागावे, कसे जगावे याची शिकवण या खेळातून मिळत जाते. आयुष्यात कधी गतिशील होत पुढे जायचे, कधी माघार घ्यायची, परिस्थितीवर मात करत कसा शह द्यायचा, थोडक्यात नकारात्मक विचारांना दूर सारत योग्य सकारात्मक विचार चक्र कसे सुरू ठेवायचे याचाच सराव या खेळाद्वारे होत असतो. खूप हुशार असणारेच हा खेळ खेळू शकतात असंही म्हंटल जातं.

त्यामुळे, हा खेळ विस्मृतीत जाऊ न देण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे. ऑनलाईन असो किंवा ऑफलाईन, या खेळात रुची निर्माण करत बुद्धिबळाला आपल्या क्रीडा जीवनाचा अविभाज्य घटक करून घेणेच श्रेयस्कर आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# घराणेशाहीचा अटळ शेवट !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**गेल्या महिन्यात महाराष्ट्रात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. शिवसेनेत झालेले बंड हे लक्षणीय ठरले. आज तर त्याचा कळस झालेला दिसला. ज्या पद्धत्तीने रामदास कदम बोलत होते, शिवाजीराव आढळराव बोलत होते त्यातून अनेक गोष्टी उघडकीस येत आहेत त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत ! तत्व आणि हिंदुत्व, मराठी माणसाची अस्मिता हे सगळे या मध्ये बिचारे उघडे पडलेले दिसत होते. छगन भुजबळ, नारायण राणे, राज ठाकरे अशी शिवसेनेतील बंड महाराष्ट्राने पाहिली आहेत पण त्यात एक फरक होता तो म्हणजे त्यावेळेस बाळासाहेब ठाकरे होते. आता त्यांचा मुलगा आणि नातू यांच्या विरोधात हे बंड आहे. मुळात एका संघटनेचा किंवा पक्षाच्या किंवा घराण्याचा विषय इतका गंभीर पणे का घ्यायचा हा पण प्रश्न आहे ! पण तो घ्यावा लागतो कारण घराणेशाहीचा रोग भारतीय राजकारणात एखाद्या विषाणू सारखा दबा धरून बसला आहे.**

गेल्या ३५ वर्षात हिंदुत्वाची भावना आणि ५० वर्षे महाराष्ट्राची अस्मिता या भावनांशी काही मंडळी खेळली आहेत. मुंबईत प्रस्थापित होताना मराठी अस्मिता होती पुढे महाराष्ट्रात बस्तान बसण्यासाठी हिंदुत्व होते. या सगळ्यातून मुंबईत कोकणातून आलेला मराठी सामान्य माणूस आणि उर्वरित महाराष्ट्रातील ग्रामिण सामान्य हिंदू तरुण आपल्या राजकीय अभिव्यक्तीसाठी शिवसेना नावाच्या पक्षाला जवळ करत गेला. यातून एक मोठी राजकीय शक्ती एका घराण्याकडे केंद्रित झाली. पण अशा घराणेशाहीचा शेवट कधीतरी होतच असतो आणि त्यामुळे महाराष्ट्रात शिवसेनेत जे घडले आहे ते भारतातील तमाम परिवारवादी पक्षांना धोक्याची सूचना आहे.

८० च्या काळात देशातील, महाराष्ट्रातील तरुण हिंदुत्वाने प्रेरित झाला होता आणि त्यासाठी तो संघर्ष करत होता. तुरुंगात जात होता. त्याचा संसार उध्वस्त होत होता. प्रस्थापित राजकारणी मंडळींकडून त्याला सर्वतोपरी जीवनातून उठवण्याचा प्रयत्न केला जात होता ! हे सगळे तो तरुण कशासाठी करत होता ? काही ठराविक घराण्याच्या हातात निरंकुश सत्ता देण्यासाठी तर खचितच करत नव्हता ! शिवसेनेतील बंडाला ही पार्श्वभूमी आहे. ही अस्वस्थता आहे. ही घालमेल आहे. गुलाबराव पाटील किंवा संदीपन घुमरे ही त्याची प्रतिकात्मक उदाहरण आहेत.

हिंदुत्वाच्या राजकीय लढाईत ज्यांच्या बरोबर संघर्ष झाला, ज्यांनी जीवनातून उठवण्याचा प्रयत्न केला, कार्यकर्त्यांना प्रसंगी ज्यांच्यामुळे जीव गमवावा लागला त्या लोकांच्या बरोबरीने बसायचे हे जो हिंदुत्वाचा विचाराने प्रेरित झाला होता त्या शिवसैनिकला पटत नव्हते. उद्धव मुख्यमंत्री झाल्याचा आनंद त्यांना होता पण आदित्य पण मंत्री आणि खाली सामान्य शिवसैनिकांची मात्र गळचेपी हे शिवसैनिकांचा गळी उतरत नव्हते.

घराणेशाही लाचारीला जन्म देते. घराणेशाही प्रत्यक्ष युद्धभूमी पेक्षा खलबतखाना चालवणाऱ्या लोकांना महत्व देते. घराणेशाहीत निष्ठा या व्यक्तीच्या प्रति समर्पित असतात. घराणेशाही मध्ये मुक्त संवाद होत नसतात. स्तुतिपाठक प्रिय असतात, स्पष्ट बोलणारे अप्रिय होतात. त्यामुळेच नार्वेकर, देसाई द्वय आणि ग्रेट संजय राऊत यांचाच बोलबाला शिवसेनेत सुरू झाला. आणि परिणाम स्वरूप हळूहळू विनाशाकडे वाटचाल सुरू झाली.

**उद्धव ठाकरे वेगळ्याच धुंदीत होते**

मोदी आणि शहा च नाही तर संघाबद्दल वाटेल ते बोलणे त्यांचे सुरू होते. ते हे विसरले होते ज्या वातावरणाचे ते लाभार्थी आहेत ते निर्माण करणाऱ्यांची आपण खिल्ली उडवत आहोत.

खरा हिंदुत्वाने प्रेरित शिवसैनिक त्यामुळे आणखी अस्वस्थ होत होता.

भारतात काँग्रेस मध्ये घराणेशाही ने प्रवेश केला आणि यथावकाश काँग्रेस संपण्याच्या स्थितीला आली. या महाराष्ट्रात मुख्यमंत्री संजय गांधी यांचे जोडे उचलत आहेत हे विदारक दृश्य आम्ही बघितले आहे. घराणेशाही सर्व संवैधानिक पदाचे अवमूल्यन करत असते कारण आम्ही कुणीतरी आहोत ज्यांनी तुम्हाला अमुक, तमुक बनवले आहे हा टोकाचा अहंकार त्यात असतो. याचा कधी तरी कुठे तरी स्फोट होणारच असतो. महाराष्ट्रात शिवसेनेत जे घडते आहे ते या घराणेशाहीतील अटळ आणि अपरिहार्य असते. पुढील पिढ्यात असणाऱ्या कर्तृत्वावर त्याची काल मर्यादा अवलंबून असते.



ही घराणेशाही सामान्य माणसाच्या समोर वेगवेगळे तत्वाचे पांघरुण घेऊन येत असते. स्वातंत्र्य चळवळीचे श्रेय लाटत नेहरू, गांधी (इंदिरा) घराण्यांनी स्वतंत्र भारतात राज्य केले. द्रविड / आर्य संघर्ष पेटवून करुणानिधी कंपूने तामिळनाडू वर कब्जा मिळवला ! शीख अस्मिता पेटवून बादल घराणे सत्ता भोगत राहिले ! धर्मनिरपेक्षतेच्या गप्पा मारणारे यादव परिवार यांनी बिहार आणि उत्तर प्रदेश काबीज केले. प्रश्न असा आहे एकीकडे घराणेशाही, त्याचा उत्कर्ष आणि दुसरीकडे अंगिकरलेल्या तत्वाचा सोयीस्कर वापर आणि माणसांच्या भावनांचा पण उपयोग हे भीषण वास्तव समजून घेणार आहोत की नाही ?

**७० वर्षाचे रामदास कदम मुलाच्या शेजारी बसून रडताना**

आज TV वर सगळे बघत होते. कालपर्यंत काका, काका म्हणणारा आदित्य त्याला मला पण साहेब म्हणावे लागते, ही कदम यांची मांडणी हे घराणेशाहीचे भीषण यथार्थ स्वरूप आहे. कदम रडले, अनेक जण रडले. पण गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्रातील दोन घराण्यांनी एकत्र येऊन जो राजकीय तमाशा केला त्यामुळे तळागाळातील जनमानस किती आक्रंदत होता हे किती जणांना समजले ?

आढळराव सांगतात शरद पवारांनी शिरूर मध्ये उभे राहू नको सांगितले आणि मध्यस्थ कोण तर भाजपचे सुभाष देशमुख ! राजकारणात असेच चालणार म्हणून हे सोडून द्यायचे की घराणी आणि त्यांच्या प्रति निष्ठा वाहणाऱ्याना कठोर शासन करायचे हे जनतेने ठरवण्याची वेळ आली आहे. लोकांना मूर्ख बनवायचे, त्यांच्या भावनांशी खेळायचे हे भाजप सहित सर्व पक्षाच्या नेत्यांनी थांबवले पाहिजे हे निश्चित !

शेतकरी आणि सहकार याची खोटी कणव दाखवत बारामतीला एक घराणे उदयास आले आणि हिंदुत्व, मराठी अस्मितेतून दादर येथे एक घराणे उदयास आले. या दोन घराण्यांनी संधीसाधू युती केली आणि यात सामान्य शेतकरी, मराठी माणूस, हिंदु जनमानस भरडून निघाला ! पण याचा कुठेतरी शेवट असतोच हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

घरणेशाहीतील लाचारीतून दबलेल्या मनाचा स्फोट होणारच असतो आणि तो शिवसेनेबाबत झाला अन्य घराण्याच्या बाबतीत तो भविष्यात येऊ घातला आहे. किंबहुना शिवसेना जात्यात आहे काही घराणे सुपात आहेत. सामान्य माणसाने या घटनेतून भावनिक किती व्हायचे ? तत्वज्ञान घेऊन दबक्या पावलाने येणाऱ्या घराणेशाहीचा कावा कसा ओळखायचा? हे शिकण्याची गरज आहे.

महाराष्टात तर सहकार आणि शेतकरी यांचे भले करायचे असले तर अशी घराणेशाही संपवून टाकणे नितांत गरजेचे आहे.

**भारत बदलतो आहे !**

एकीकडे एक सामान्य स्थितीत जन्माला आलेल्या पण कर्तृत्ववान वनवासी महिला द्रौपदी मुर्मु यांच्या रूपाने राष्ट्रपती पदावर विराजमान होण्यास सिद्ध होत असताना भारतीय राजकारणाला लागलेला घराणेशाहीचा रोग जर नष्ट झाला तर स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षातील खूप मोठी उपलब्धी असेल !

# कर्करोगाचा वाढता धोका



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी


**भारतात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वर्षानुवर्षे वाढ होत आहे. दोन वर्षांत कॅन्सरच्या रुग्णांमध्ये सुमारे 67 हजारांनी वाढ झाली असून, ती पाच टक्क्यांहून अधिक आहे. राज्यसभा खासदार राकेश सिन्हा यांनी संसदेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय आरोग्य मंत्री भारती पवार यांनी त्यांच्या उत्तरात भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आइसीएमआर) च्या 'नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री रिपोर्ट, 2020'चा हवाला दिला. 2018 मध्ये देशात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या 13 लाख 25 हजार 232 होती. 2019 मध्ये ही संख्या 13 लाख 58 हजार 415 पर्यंत वाढली होती. 2020 मध्ये देशातील कर्करोगाच्या रुग्णांची संख्या 13 लाख 92 हजार 179 झाली आहे. म्हणजेच, दोन वर्षांत कर्करोगाच्या रुग्णांमध्ये सुमारे 67 हजारांनी वाढ झाली आहे, जी पाच टक्क्यांहून अधिक आहे. मात्र मंत्र्यांच्या उत्तरात 2021 आणि 2022 च्या आकडेवारीचा उल्लेख करण्यात आलेला नाही.**

'आइसीएमआर'च्या अहवालानुसार, देशात कर्करोगाचा सर्वाधिक प्रसार मिझोराम राज्यातील आयझोल जिल्ह्याच्या नोंदणीमध्ये दिसून आला आहे. एक लाख लोकसंख्येमागे 206.2 पुरुष आणि 174.6 महिला कर्करोगाचे रुग्ण आहेत. आयझोल नोंदणी डेटा 2012-2016 साठी आहे. यानंतर आसाम राज्यातील कामरूप शहरी क्षेत्राचा नंबर येतो. 2012-2016 च्या आकडेवारीनुसार, एक लाख लोकसंख्येमागे 190.5 पुरुष आणि 150.8 महिला कर्करोगाने ग्रस्त आहेत. महाराष्ट्रातील उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यात कर्करोगाचे प्रमाण देशात सर्वात कमी आहे. 2012-2015 च्या आकडेवारीनुसार, येथे एक लाख लोकसंख्येमागे 39.3 पुरुष आणि 52.8 महिला कर्करोगाचे रुग्ण आहेत.

राष्ट्रीय राजधानी दिल्ली क्षेत्रामधील 2012-2014 च्या आकडेवारीनुसार, एक लाख लोकसंख्येमागे 112.3 पुरुष आणि 119.6 महिला कर्करोगाने ग्रस्त आहेत. त्याचप्रमाणे, पटियाला जिल्हा नोंदणीमध्ये, एक लाख लोकसंख्येमागे 101.6 पुरुष आणि 127.7 महिला कर्करोग रुग्ण आहेत.

दुसरीकडे, जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, सध्या जगभरात दरवर्षी कर्करोगाचे एक कोटी नवीन रुग्ण आढळून येतात. डब्ल्यूएचओच्या नवीन अंदाजानुसार, भारतातील प्रत्येक 10 भारतीयांपैकी एकाला त्याच्या पूर्ण आयुष्यात कर्करोग होण्याचा धोका आहे आणि 15 पैकी एकाचा कर्करोगामुळे मृत्यू होऊ शकतो. केवळ विकसित देशांमध्येच नाही तर गरीब आणि विकसनशील देशांमध्येही या असाध्य रोगाने दरवर्षी लाखो लोकांचा बळी जात आहे.

कर्करोगाशिवाय भारतात एड्स, पक्षाघात, हृदयविकाराचा झटका, मधुमेह असे अनेक आजार आहेत जे दरवर्षी लाखोंचा जीव घेत आहेत. भारतात गेल्या पंधरा वर्षांत कर्करोगाचा प्रसार झपाट्याने झाला आहे. इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर (आयएआरसी) ने अंदाज वर्तवला आहे की आगामी काळात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या अधिक वेगाने वाढेल. असा अंदाज आहे की 2025 पर्यंत पाच पैकी एक पुरुष आणि सहा पैकी एक महिला कर्करोगाचे निदान करेल आणि पाच पैकी एका महिलेचा या आजाराने मृत्यू होईल. भारतात दर दोन मिनिटाला तीन लोकांचा कर्करोगाने मृत्यू होतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. कर्करोग संस्थेच्या अंदाजानुसार, दरवर्षी 20 लाखांहून अधिक लोक केवळ या आजाराने मृत्यू पावतील आणि सक्रिय प्रकरणांच्या संख्येत लक्षणीय वाढ होईल.



कॅन्सरबाबतच्या आकडेवारीचे जे चित्र पाहायला मिळत आहे, ते खूपच भीतीदायक आहे. राष्ट्रीय कर्करोग नोंदणी कार्यक्रमाच्या अहवालानुसार, 2020 मध्ये कर्करोगाच्या 13 लाख नव्वद हजार रुग्णांची नोंद झाली आहे. 2025 पर्यंत हा आकडा 15 लाखांच्या पुढे जाऊ शकतो ही चिंतेची बाब आहे. सर्वेक्षणानुसार एकूण कर्करोगाच्या मृत्यूंपैकी 13.5 टक्के मृत्यू स्तनाच्या कर्करोगाने, 10.3 टक्के तोंडाच्या कर्करोगाने, 9.4 टक्के गर्भाशयाच्या कर्करोगाने आणि साडेपाच टक्के फुफ्फुसाच्या कर्करोगाने मृत्यू होतात. त्याचप्रमाणे कर्करोग झालेल्या 26.3 टक्के महिलांचा मृत्यू स्तनाच्या कर्करोगाने, 6.7 टक्के गर्भाशयाच्या कर्करोगाने आणि 4.6 टक्के महिलांचा तोंडाच्या कर्करोगाने मृत्यू होतो. भारतात, कर्करोगाने ग्रस्त 16.3 टक्के पुरुष तोंडाच्या कर्करोगाने, 8.8 टक्के फुफ्फुसाच्या आणि 6.8 टक्के पोटाच्या कर्करोगाने मृत्यू पावतात. हे लक्षात घेण्यासारखे आहे की गेल्या काही वर्षांत पुरुषांमध्ये तोंडाच्या कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. तंबाखूच्या सेवनामुळे हे प्रमाण अधिक वाढत आहे. विशेष म्हणजे, गेल्या दहा वर्षांत कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण दुप्पट झाले आहे. साहजिकच या आजाराला तोंड देण्यासाठी सरकारी यंत्रणेकडे जितकी मजबूत यंत्रणा हवी तितकी नाही. त्याची आज गरज आहे. श्रीमंत लोक परदेशात किंवा महागड्या खाजगी रुग्णालयात उपचार घेऊ शकतात, परंतु कर्करोगावरील उपचार सामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. आर्थिकदृष्ट्या मागास समजल्या जाणाऱ्या प्रदेशांमध्ये इतर सर्व आजारांप्रमाणेच कर्करोगही वेगाने वाढत आहे. जर आपण बिहारबद्दल बोलायचे म्हटले, तर हे असे राज्य आहे की गेल्या काही वर्षांत कर्करोगाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. कर्करोग संस्थेच्या आकडेवारीनुसार, बिहारमध्ये दरवर्षी सुमारे एक लाख रुग्ण आढळून येत आहेत. येथील बहुतांश रुग्ण हे तंबाखूचे सेवन करणारे आणि तोंडाच्या कर्करोगाने ग्रस्त आहेत. महिलांमध्ये गर्भाशय आणि स्तनाचा कर्करोग आणि पुरुषांमध्ये यकृत आणि तोंडाचा कर्करोग झपाट्याने वाढत आहे. येथे 79 टक्के महिला कर्करोगाने ग्रस्त आहेत, तर पुरुषांची संख्या केवळ 29 टक्के आहे. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, दिल्ली, राजस्थान, कर्नाटक आणि तामिळनाडू इत्यादी राज्यांमध्ये कॅन्सरची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने कर्करोगाचा सामना करण्यासाठी अनेक पातळ्यांवर तयारी केली आहे, परंतु कोरोनाच्या हल्ल्याने त्यांना ग्रहण लावले. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशांमध्ये कर्करोगाचे प्रमाण खूप वेगाने वाढत आहे. डब्ल्यूएचओच्या आकडेवारीनुसार, 2018 मध्ये जगभरात कर्करोगाची एकूण एक कोटी ऐंशी लाख प्रकरणे नोंदवली गेली, त्यापैकी 96 लाख मृत्यू झाले. यापैकी सत्तर टक्के मृत्यू गरीब देशांमध्ये किंवा भारतासारख्या मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये झाले आहेत. यावर्षी भारतात कर्करोगामुळे सुमारे आठ लाख मृत्यू झाले. म्हणजेच जगातील एकूण कर्करोगाच्या मृत्यूपैकी आठ टक्के मृत्यू एकट्या भारतात झाले आहेत, तर विकसित देशांमध्ये हा आकडा तीन ते चार टक्के आहे.

भारतात कॅन्सरचे वाढते रुग्ण आणि अधिक मृत्यूचे कारण म्हणजे डॉक्टरांची तीव्र कमतरता आहे. भारतात दोन हजार कॅन्सर रुग्णांमागे एकच डॉक्टर आहे, तर अमेरिकेत हे प्रमाण शंभर रुग्णांमागे एक डॉक्टर आहे, म्हणजेच भारतापेक्षा वीस पटीने अधिक आहे. कर्करोग रोखण्यासाठी वेळीच ठोस पावले उचलली नाहीत, तर तो साथीचे रूप घेऊ शकतो, असा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. जागतिक स्तरावर कर्करोगाबाबत अधिकाधिक जनजागृती करण्यावर संस्थेने भर दिला आहे.

भारतातील निम्म्या लोकसंख्येमध्ये म्हणजेच महिलांमध्ये कर्करोगाचे रुग्ण आढळून आले आहेत, जे प्रामुख्याने मजुरी, नोकरी, शेती किंवा घरी राहण्याचे काम करतात. या रोगाचा त्रास होण्याची अनेक कारणे आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे गुणसूत्रातील विषमता, अंतर्गत बदल आणि जनुकांचे उत्परिवर्तन तसेच हार्मोन्समधील अकाली बदल. महिलांमध्ये, पॅपिलोमा विषाणूमुळे गर्भाशयाच्या मुखाचा आणि गर्भाशयाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. एचआयव्ही संसर्ग देखील कधीकधी कर्करोगाचे कारण बनतो. त्याचप्रमाणे हेलिओ जीवाणूमुळे जठराचा कर्करोग आणि पेप्टिक अल्सरचा धोका जास्त असतो. आज ताणतणाव, आधुनिक आहार यामुळे हा आजार विशेषतः शहरांमध्ये झपाट्याने वाढत आहे.

भारतातील गरीब मजूर आणि शेतकऱ्यांमध्ये कॅन्सरची अधिक प्रकरणे आढळून आल्याने चिंता वाढली आहे. बिहार, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये लाखो कामगार कोळसा खाणी, सिमेंट कारखाने, स्टोन क्रशिंग मशीन आणि चर्मोद्योगात गुंतलेले आहेत. त्याचप्रमाणे सिमेंट उद्योग, विडी पानाचे उद्योग, इतर धूळ व धुराचे कारखाने, बांगडी उद्योग, वीटभट्ट्या, रस्ते, रासायनिक कारखाने आदी उद्योगांमध्ये गुंतलेल्या मजुरांची अवस्थाही अशी आहे की ते या धोकादायक आजाराच्या धोक्यापासून बाहेर नाहीत. खरे तर कर्करोगाच्या कारणांबाबत सरकारची जनजागृती मोहीम अत्यंत संथ आहे. खेड्यांमध्ये तर ते अगदीच नगण्य आहे. केवळ आकडेवारीचा संदर्भ देऊन सर्वसामान्यांना कॅन्सरपासून बचावाची जाणीव करून देता येणार नाही. दुसरे म्हणजे, लोकांमध्ये असलेली भीती दूर करण्याचे कामही करावे लागेल. सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, कर्करोगाची बाब रुग्णासमोर येताच त्याला मृत्यू समोर उभा असल्याचे दिसू लागते. कर्करोग म्हणजे मृत्यू. मात्र तसे नाही. रोगाचे वेळेत निदान झाले आणि उपचार उपलब्ध झाले तर आज सर्व प्रकारचे कर्करोग बरे होऊ शकतात.

# ओबीसी राजकीय आघाडीचा नवा पर्याय!



प्रा.श्रावण देवरे
संपर्क क्र. 8830127270

आधुनिक केसरी

**बांटिया आयोगाने ओबीसींची लोकसंख्या कमी दाखवली आणी लगेच काही मराठा नेते ओबीसींच्या ताटातील तुकडा मागू लागलेत, हा काही योगायोग नाही. बांटियासाहेबांची नियुक्ती करण्यामागे अजित पवारांचा हाच उद्देश होता, त्याप्रमाणे ही सर्व नौटंकी घडते आहे. बांटिया हे एकूणच आरक्षणाच्या विरोधी असलेली व ओबीसींचे शत्रू म्हणून कुप्रसिद्ध व्यक्ती आहेत. ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करण्याचे महापाप याच बांटियांच्या नावे जमा आहे. समर्पित आयोगाच्या अध्यक्षस्थानी बसवतांना त्यांचे हेच ओबीसीविरोधी मेरीट पाहिले गेले आहे. बांटियांची नियुक्ती करीत असतांनाच मंत्रीमंडळातील ओबीसी मंत्र्यांनी त्याला विरोध करायला पाहिजे होता. परंतू अजित पवारांच्या समोर गांडीत शेपूट घालणारे आमचे दोघे ओबीसी-मंत्री आता अहवाल बाहेर आल्यावर बोंबलत आहेत. आता तर सरकारही गेलं आणी मंत्रीपदही गेलं आहे. अर्थात मंत्री असतांनाही ते षंढ व नामर्दच असल्याचे यापुर्वीही अनेकवेळा सिद्ध झालेले आहे.**

राजकारणातील हे दोघे ओबीसी नेते षंढ व नामर्द असल्याचे अनेकवेळा सिद्ध झालेले असूनही आमचे काही ओबीसी कार्यकर्ते त्यांनाच मोर्च्याचे नेतृत्व करायला बोलावतात. जोपर्यंत तुम्ही घरातले जुनाट व निकामी झालेले फर्निचर घराबाहेर काढून भंगारात देत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तुमच्या घरात नवं उपयुक्त फर्निचर आणू शकत नाहीत, हा साधा-सरळ कॉमन सेन्स आहे. ओबीसींवर अन्याय करण्यासाठी बांटियांची नेमणूक राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवारांनी केली. अजित पवारांनी केलेल्या या अन्याविरुद्ध ओबीसीचा जो मोर्चा काढला जातो आहे, त्याचे नेतृत्व करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्याच ओबीसी नेत्याला बोलावले जाते आहे. हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा ओबीसी नेता मोर्च्यात भाषण करतांना बांटियाविरोधात भरपूर बोलेल, परंतू बांटियाची नियुक्ती करणार्‍या अजित पवारांविरोधात बोलू शकणार नाही, कारण अजित पवार या ओबीसी नेत्याचा मालक आहे व तुमचा ओबीसी नेता अजित पवारांचा गुलाम! अशा परिस्थितीत तुम्ही अन्यायाच्या मूळापर्यंत जाउच शकत नाही व अन्याय मूळापासून उखडूच शकत नाही. मराठा-ब्राह्मणांनी तुमच्यावर जे ओबीसी नेते लादलेले आहेत, ते फक्त भाषणबाजी करण्यासाठी व निवडणूकीत तुमची मते घेऊन पुन्हा त्याच अजित पवार-फडणविसांसारख्यांना सत्तेत बसवण्यासाठी आहेत! याच दोन्ही दलाल नेत्यांना तुम्ही ओबीसी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलावतात, हेच दलाल नेते तुमच्या ओबीसी मोर्च्याचे नेतृत्व करतात.

**(उत्तरार्ध)**

या दोन्ही नेत्यांना तुमच्या मोर्च्याचे नेतृत्व करण्यासाठी अवश्य बोलवा, मात्र त्यांना जाब विचारा कि, अजित पवार जेव्हा बांटियांची नेमणूक करीत होते, तेव्हा तुम्ही दोघे ओबीसी-मंत्री कूठे झोपा काढीत होते? इम्पिरीकल डेटा गोळा करण्यासाठी 435 कोटी रूपयांची गरज असतांना, अजित पवारांनी हा निधी दिलाच नाही. तेव्हा तुम्ही ओबीसी नेते म्हणून अजित पवारांना हा निधि द्यायला का भाग पाडले नाही? ओबीसींचे आरक्षण कमी करून ते मराठ्यांना देण्याचे षडयंत्र अजित पवार-फडणवीसांनी रचलेले असतांना हे दोघे मंत्री पवार-फडनवीसांची गुलामी का करीत आहेत? मला माहीत आहे, आपल्याच नेत्यांना प्रश्न विचारण्यासाठी अंगात मर्दानगी लागते. मोर्च्याचे नियोजन करणार्‍यांमध्ये असे प्रश्न विचारण्याची हिम्मत नसेल तर त्यांनी ओबीसी जनतेची दिशाभूल करण्यासाठी मोर्चा काढला आहे, असा त्याचा अर्थ होतो. जोपर्यंत हे दलाल लोक तुमचे नेते बनून राहतील, तोपर्यंत पवार-फडणविस आलटून-पालटुन सत्तेवर येत राहतील व ओबीसींवरचा अन्यायाचा सिलसिला सुरूच राहील! आपले ओबीसी नेते फडणवीस-पवारांसारख्या मराठा-ब्राह्मणांचे गुलाम आहेत व ते ओबीसींसाठी काहीच करू शकत नाही, हे माहीत असूनही या ओबीसी नेत्यांना कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून का बोलावले जाते, मोर्च्याचे नेतृत्व करण्यासाठी या दलाल ओबीसी नेत्यांना का बोलावले जाते? कारण कार्यक्रमाचे आयोजक व मोर्च्याच्या संयोजकांना आपला खाजगी व्यक्तीगत स्वार्थ या नेत्यांकडून साधुन घ्यायचा असतो. संयोजकांपैकी कोणाला तरी नगरसेवकचे तिकीट पाहिजे असते, कुणाला विधान परीषदेत आमदार व्हायचे असते, एखाद्या कार्यकर्त्याची फाईल मंत्रालयात अडकलेली असते, आयोजकांपैकी एखाद्या हुशार माणसाला महामंडळावर किंवा आयोगावर सदस्य म्हणून जायचे असते. एखादा ओबीसींचा कार्यक्रम झाला, ओबीसींचा मोर्चा झाला की त्यात या ओबीसी नेत्यांची चमकोगिरी होत असते व मोर्चा आयोजित करणार्‍या कार्यकर्त्यांचे खाजगी काम मार्गी लागत असते. मात्र मोर्च्यासाठी आलेल्या प्रामाणिक लोकांची फसवणूक होते. कारण अशा मोर्च्याला सत्ताधारी कवडीचीही किंमत देत नाहीत, कारण मोर्च्याचे नेते हे त्यांच्या गोठ्यातले बैल असतात. ओबीसींवर वारंवार होणार्‍या अन्यायाला मूळापासून उखडून टाकायचे असेल तर तुम्हाला तामीळनाडूप्रमाणे व बिहारप्रमाणे स्वतंत्र व स्वाभिमानी ओबीसी नेते निर्माण करावे लागतील.

राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, शिवसेना, भाजपासारख्या पक्षातील ओबीसी नेते हे मराठा-ब्राह्मणांचे गुलाम आहेत. या दलाल ओबीसी नेत्यांमुळे आपण निवडणूकीत याच पक्षांना मते देतो. त्यामुळे हेच पक्ष आलटून-पालटून सत्तेवर येत राहतात व तुमच्यावरचा अन्यायही चालूच राहतो. फडणवीसांसारखे षडयंत्रकारी राजकीय नेते आपली दिशाभूल कशी करतात, याचे ताजे उदाहरण पाहा-

फडणवीस जेव्हा विरोधी पक्षात होते तेव्हा त्यांनी बांटिया आयोगाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला होता. परंतू हेच फडणवीस जेव्हा सत्तेत येतात, तेव्हा बांटिया आयोगाचा अहवाल जसाच्यातसा स्वीकारतात व सुप्रिम कोर्टात दाखलही करतात. फडणवीस हे सच्चे ओबीसीचे हितचिंतक असते तर त्यांनी सत्तेत येताच जी पहिली बैठक ओबीसींसाठी घेतली, त्या बैठकित त्यांनी बांटियांची हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला असता व त्यांचेजागी ओबीसी कॅटेगिरीतील अभ्यासू माजी न्यायधिशांची नियुक्ती केली असती. तसेच नव्याने सर्व्हेक्षण करण्यासाठी लागणारे 435 कोटी रूपये निधीही त्वरीत मंजूर केला असता. फडणवीसांनी असे काहिही न करता बांटिया आयोगाचा अहवाल स्वीकारला. याचा अर्थ असा होतो कि, अजित पवार व फडणवीस हे दोघेही एकमेकांना सामील आहेत. ओबीसींची लोकसंख्या कमी (37 टक्के) दाखवून ओबीसी आरक्षण कमी करणे व त्या कमी केलेल्या ओबीसी आरक्षणाचा तुकडा मराठ्यांच्या ताटात टाकणे, असे हे षडयंत्र ठरलेले आहे व या षडयंत्रात आमचे दोघे ओबीसी नेते सामील आहेत. आमचे हे ओबीसी नेते पवार-फडणवीसांच्या षडयंत्रात सामील का झालेले आहेत? कारण या नेत्यांना ईडी-सीबीआयची भीती वाटते. बिहारचे लालू यादव यांना अनेकवेळा जेलमध्ये टाकले, परंतु तरिही लालूजी आजही संघ-भाजपाच्या




विरोधात आक्रमकपणे उभे आहेत. ते खरे मर्द ओबीसी नेते! महाराष्ट्रातील आमचे हे ओबीसी नेते म्हणजे कुर्‍हाडीचा दांडा गोतास काळ आहेत, हे ज्यादिवशी सर्वसामान्य ओबीसी कार्यकर्त्यांच्या लक्षात येईल, तो ओबीसी चळवळीसाठी खरा मुक्तीदिन असेल. गोतास काळ ठरणारे हे ओबीसी नेते बाजूला सारून नवे प्रामाणिक व वैचारिक नेतृत्व निर्माण केले तरच ओबीसींच्या भावी पिढ्यांचे भवितव्य उज्वल बनेल.

तामिळनाडू व बिहारच्या धर्तीवर स्वाभिमानी ओबीसी नेत्यांची निर्मीती करण्यासाठी आपणास नवा राजकीय पर्याय द्यावा लागेल. त्यासाठी आम्ही 'ओबीसी राजकीय आघाडी' स्थापन केली असून या आघाडीत प्रामाणिक ओबीसी कार्यकर्त्यांनी सामील व्हायचे आहे. आपापल्या ओबीसी संघटनांचे व ओबीसी पक्षांचे अस्तित्व कायम ठेवून या राजकीय आघाडीत सामील होता येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या होऊ घातलेल्या पुढील निवडणूकीत आम्ही ओबीसी राजकीय आघाडीतर्फे प्रामाणिक उमेदवार उभे करीत आहोत. ज्यांना खरोखर ओबीसींवर होणार्‍या अन्यायाविरोधात चीड व चाड असेल त्यांनी या ओबीसी राजकीय आघाडीत सामील व्हावे.

अर्थात अन्याय केवळ ओबीसींवरच होतो, असे नाही. दलित, आदिवासी, मुस्लीम अल्पसंख्यांक जाती-जमातींवरसुद्धा होत आहे. दलितांच्या विकासासाठी असलेल्या सामाजिक न्याय विभागातून 108 कोटी रूपये काढून घेउन ते मराठ्यांच्या सारथीला देणारे अजित पवारच आहेत. प्रमोशनमधील आरक्षण कोणी काढून घेतले, अजित पवारांनीच! दलित विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व इतर योजना राबविण्यासाठी बार्टीला निधी दिला जात नाही, त्याला जबाबदार कोण, अर्थात अर्थमंत्री अजित पवारच! कॉंग्रेसतर्फे बौद्ध चंद्रकांत हंडोरे हे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार होते व मराठा भाई जगताप हे दुसर्‍या क्रमांकाचे उमेदवार होते. तरीही कॉंग्रेसच्या मराठा सरंजामदारांनी पक्षाचा आदेश बाजूला सारीत केवळ मराठा म्हणून भाई जगतापांना निवडून आणले व हंडोरेंना पराभुत केले. सरकार फडणवीस-पेशव्याचे असो कि मराठा चव्हाण-पवारांचे, ओबीसी, दलित, आदिवासी, मुस्लिम या शोषित समाजघटकांवर अन्याय होतच असतो. म्हणून कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, भाजपा व तत्सम मनसे-फणसे सारख्या जातीयवादी पक्षांना पर्याय म्हणून नवा समतावादी पक्ष तुम्हाला उभा करावाच लागेल.

आम्ही ओबीसी राजकीय आघाडी स्थापन केल्यानंतर काही दलित कार्यकर्त्यांचे फोन आम्हाला आलेत. त्यांनी आमच्यासोबत काम करण्याची ईच्छा व्यक्त केली, मात्र आघाडीच्या नावात फक्त ओबीसी शब्द आहे. दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक अशा सर्वच शोषित जाती-जमातींना सोबत घेण्यासाठी आम्ही ''ओबीसी-रिपब्लीकन राजकीय आघाडी'' असे नामांतर या आघाडीचे करीत आहोत. रिपब्लीकन म्हणजे जुने प्रस्थापित दलित नेते नव्हेत, तर रिपब्लीकन म्हणजे 'फुलेआंबेडकरांना मानणारे प्रामाणिक कार्यकर्ते' असा त्याचा अर्थ होतो.

ओबीसी रिपब्लीकन राजकिय आघाडीचे अस्तित्व पक्ष म्हणून राहील काय, त्याचे स्वरूप कसे असेल, ध्येय-धोरण काय असेल, उमेदवार निवडीच्या कसोट्या काय असतील या विषयांवर आपण पुढील आठवड्यात चर्चा करू या! तोपर्यंत जयजोती, जयभीम, सत्य की जय हो!

# खेळाच्या माध्यमातून मुलींना बलशाली बनवूया

आधुनिक केसरी

**नाशिक : आजच्या भारतीय समाज व्यवस्थेत वेळोवेळी सुधारणा होत असल्यामुळे महिलांच्या बाबतीत बऱ्यापैकी समाधान वाटतं कारण आज प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान संधी देण्याचा प्रयत्न आपला भारतीय समाज करत असल्यामुळे "भारतीय नारी शक्तीने जागतिक पातळीवर ठसा उमटविला आहे." २१ व्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील भारतीय समाज रचनेत सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक बदल झालेले आपल्याला दिसून येतात, खरं तर लोकशाही राष्ट्रात अशा प्रकारचे बदल काळानुसार होणे हे समाज हितासाठी अपेक्षितचं आहे, लोकशाही राष्ट्रात सर्वांन समानता असणं आवश्यक आहेचं तिथं पुरुष किंवा महिला असा भेद नसतोचं आणि काही बदल हे आपण भारत स्वातंत्र्याच्या अगोदर, स्वातंत्र्यादरम्यान, स्वातंत्र्यानंतर व आज अशा चार भागात विभागून अभ्यास केला तर असं लक्षात येतं की त्या-त्या काळातील परिस्थितीनुसार समाज हिताच्या दृष्टीने बऱ्याच प्रमाणात महिलांच्या बाबतीत भारतीय समाजसुधाराकांकडून काही बदल घडवून आणले गेले जे बदल महिलांच्या प्रगतीचे प्रेरणास्रोत ठरले, मागील काही काळात महिलांच्या बाबतीत सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक परिस्थिती काय होती आणि आजच्या २१ व्या आधुनिक शतकात बदललेल्या भारतीय नारी शक्तीची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती काय आहे यावरून असं लक्षात येतं की आपला देश विकसनशीलतेकडून बलशाली महासत्तेकडे अग्रेसर वाटचाल करत आहे.**

पण आजही भारतीय महिलांच्या बाबतीत विचार केला तर भारतीय समाज व्यवस्थेत पुरुषप्रधान संस्कृती बऱ्याच ठिकाणी दिसुन येते, काही बाबतींत महिलांना समान संधी मिळतचं नाही, आजही "चूल आणि मूल" हेचं तिचं आयुष्य आहे असं मानणारा एक मोठा गट समाजात सक्रिय असल्यामुळे महिलांच्या कला गुणांना वाव मिळत नाही, त्यांना शिक्षणापासून दूर ठेवलं जातं, अगदी कमी वयात लग्न लावून जवाबदारीचे संकट तिच्यावर लादले जाते त्यामूळे तिचं मानसिक खच्चीकरण होत, शारीरिक व मानसिक आरोग्याच्या बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते.

क्रीडा क्षेत्राच्या दृष्टीने विचार केला आपल्या समाज व्यवस्थेत मुलांना अधिक पाठबळ असतं तर त्यामानाने मुलींना फार कमी संधी दिली जाते, खरंतर आपण इतर देशांच्या तुलनेत महिलांना क्रीडा क्षेत्रात फार कमी संधी देतो, जर हरियाणा, पंजाब, काही प्रमाणात महाराष्ट्र सोडलं तर इतर राज्यांत मुलींना क्रीडा क्षेत्रात फार कमी पाठबळ आपल्या भारतीय समाजाकडून दिली जाते. भारतात क्रिकेट हा खेळ किती लोकप्रिय आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहेच, पण कधी आपण भारतीय महिला क्रिकेट संघाचा सामना बघितला का... ? हा जर कोणाला प्रश्न केला तर बऱ्याच लोकांच्या तोंडातून उत्तर नाहीचं येणार त्याचं कारण म्हणजे आपल्या समाजात पुरुष प्रधान संस्कृतीला दिले जाणारे अति महत्व आहे. २०१८ नंतर भारतीय महिला क्रिकेट संघाला प्रोत्साहन समाज व शासन व्यवस्थेकडून मिळू लागल्यामुळे, महिला क्रिकेट संघाचा खेळ अधिक उंचावला. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत भारतीयांचा मान महिलांनीच राखला असं म्हटलं तर हरकत नाही बॅडिंटनमध्ये पी.व्ही. सिंधु तर कुस्तीमध्ये साक्षी मल्लिक यांनी उत्कृष्ट कामगिरी करत ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत पदक मिळवत "नारी शक्तीचा जागरचं जणू घडवुन आणला असं चित्र त्यावेळेस डोळ्यांसमोर उभं होतं. २०२० च्या टोकियो (जपान) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेतही मीराबाई चाणू, लवलीना बोरगोवो, पी.व्ही. सिंधू यांनी पदक मिळवत मोलाची कामगिरी केली तर भारतीय महिला हॉकी संघाने उत्कृष्ट कामगिरी करत असंख्य भारतीयांचे मने जिंकली ही भारतीय नारी शक्तीची किमया आहे. ६ वेळेची जगविजेती बॉक्सिंगपटू बॉक्सर मेरी कॉम आज अनेक महिला खेळाडूंची आदर्श बनली आहे आणि नेहमीचं तिचा प्रवास नवख्या खेळाडूंना प्रेरणा देत असतो.



पी.टी. उषा, कर्नंम मल्लेश्वरी, गीता, बबिता, विनेश फोगाट, मिताली राज, स्मुती मानंधना, हरमित कौर, राणी रामपाल, वंदना कटारिया, सायना नेहवाल, मीराबाई चानू, पी.व्ही. सिंधू, सानिया मिर्झा, निकत झरीन सारख्या अनेक महिला खेळाडू नवख्या खेळाडूंच्या प्रेरणा बनल्या आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकदा आपल्या खेळातून गगन भरारी घेतली आहे.

भारतीय नारी शक्तीचे क्रीडा पंख हे बलदंड होत राहो, समाजाने क्रीडा क्षेत्रात मुलींना मुलांच्या बरोबरीने संधी दिली पाहिजे, खरंतर आजही ग्रामीण भागात मुलींच्या बाबतीत क्रीडा क्षेत्रात फार नकारात्मक दृष्टिकोन रुजला आहे, मुलींना क्रीडा क्षेत्रात संधी देण्यासाठी समाजाने सकारात्मक दिशेने वाटचाल करावी जेणेकरून तिला तिच्या क्रीडा पंखांना गगन भरारी घेता येईल व तिचं मानसिक व शारीरिक आरोग्याची काळजी घेता येईल, महिलांचे क्रीडा सबलीकरण होणं हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे, त्याचबरोबर समाजात काही महामूर्ख नराधमापासून संरक्षण व्हावे यासाठी तिला बलदंड व बलशाली होण्यास मदत करणे ही आपली समाजबांधव म्हणून महत्वपूर्ण भूमिका असेल.

मुलींच्या क्रीडा पंखांना बळ देणं म्हणजे एक आदर्श समाज व्यवस्था निर्माण होईल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय नारी शक्तीचे बळ हे जगाच्या क्रीडा इतिहासात एक आदर्श निर्माण करेल. ग्रामीण भागातील मुलींच्या क्रीडा पंखांना बळ देण्यासाठी समाजाने सकारात्मक दिशेने वाटचाल करावी जेणकरून चूल आणि मुल ही संस्कृती आळा बसवत त्यांच्या आरोग्याची काळजी त्यांना घेता येईल. मैदानावर मुलींना मुलांच्या बरोबरीने खेळू द्या कारण एक आदर्श समाज व्यवस्था निर्माण करायची असेल तर खेळातून महिला-पुरुष समानता निर्माण होणं आवश्यक आहे, त्याचबरोबर समाजात सुदृढ आरोग्याची एक आदर्श प्रणाली विकसित व्हावी यासाठी मुलींना मैदानावर शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने खेळू द्या. तिच्या संरक्षणाची जबाबदारी समाज म्हणून आपली आहे, त्यामूळे तिला तिच्या क्रीडा पंखांना ओळखू द्या, बलदंड होऊ द्या.

आज शहरात बऱ्यापैकी क्रीडा क्षेत्रात मुलींना संधी दिली जाते यामुळे समाधान नेहमी वाटतं. समाजात महिलांच्या बाबतीत सातत्याने होणारे दुर्लक्ष हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत अवघड परिस्थिती भविष्यात निर्माण करेल, त्यामूळे मुलींना मैदानावर शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत करणं ही काळाजी गरज आहे. मुलींचं आयुष्य हे फक्त चूल आणि मूल यासाठी सिमित नाही तर तिने धैर्य, सामर्थ्य, बलशाली, बलदंड ताकदीने ह्या जगात तिनं वावरावं, या रणात तिनं रणरागिणी सारखं लढावं यासाठी तिला तिच्या क्रीडा पंखांना बलदंड होऊ द्या, तिला खेळू द्या,लढू द्या आणि तिला बलदंड होऊ द्या.

**"जागर नारी शक्तीचा, विजय तिच्या क्रीडा पंखांचा"**

**पूनम सोनवणे**
**(शारीरिक शिक्षण शिक्षिका, नाशिक)**

# 'संपत्तीचे व आनंदाचे रहस्य'



संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**नवल रविकांत हे सिलिकॉन व्हॅली आणि जगातील स्टार्टअप उद्योग संस्कृतीतील विख्यात नाव आहे. त्यांनी अनेक उद्योगांची उभारणी केली आहे. एंजललिस्टचे ते सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. ट्विटर, उबेर, पोस्टमेट्स अशा शेकडो कंपन्यांत त्यानी योग्य अंदाज बांधून सुरुवातीच्या काळात गुंतवणूक केली आहे. आर्थिक यशाबरोबरच आरोग्यपूर्ण, समतोल व शांत आयुष्य जगणेही त्याना साध्य झाले आहे. नवल रविकांत यांनी ट्विटर, ब्लॉग, पॉडकास्ट द्वारे आपले ज्ञान इतरांबरोबर शेअर केले आहे. यश आणि आनंद यांचे दुर्मिळ मिश्रण नवलना साध्य झाले आहे. एरिक जॉर्गनसन यांनी लोकसेवेच्या विचाराने हे पुस्तक तयार केले आहे. पुस्तक ई-पुस्तक रुपात सर्वांसाठी मोफत उपलब्ध आहे. 'संपत्तीचे व आनंदाचे रहस्य' या नावाने सीमा भानू यांनी ते मराठीत अनुवादित केले आहे.**

तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र यांचा गाढा अभ्यास आणि त्याचा उपयोग करून कमावलेली संपत्ती यातून नवल यानी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव दाखवून दिला आहे. त्यांनी इतरांना समोर मांडलेले ज्ञान व अनुभव याचे संकलन या पुस्तकात आहे. सर्वांना त्यांच्या सारखेच यश मिळावे यासाठीचा हा प्रयत्न आहे. नवल यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक क्षण आनंदाने जगा, छोट्या छोट्या चिकाटीने टाकलेल्या पावलांमुळे खूप काही मिळवता येते. नेमके काय करावे, कोणाबरोबर आणि कधी करायचे हे कळण्याचा संबंध श्रीमंत होण्याशी आहे. मेहनतीपेक्षा गोष्टी समजून घेण्याला महत्त्व आहे. मेहनत महत्त्वाची आहे पण ती योग्य दिशेने करायला हवी. लोकांना जी गोष्ट हवी आहे पण ती कशी मिळवायची माहित नाही, ती त्यांना देऊन तुम्ही श्रीमंत होऊ शकता. खूप काळ टिकणारा व्यवसाय तसेच लोक निवडा. तुमचा वेळ कोणालातरी देऊन त्या बदल्यात तुम्ही श्रीमंत होऊ शकणार नाही. आर्थिक स्वातंत्र्यासाठी तुमच्याकडे तुमचा तसा व्यवसाय हवा. इंटरनेटमुळे कामाच्या संधीत खूप वाढ झाली आहे. आपला भागीदार निवडताना हुशार, कुशाग्र बुद्धी, ऊर्जा आणि निष्ठा बघून निवड करा. शंकेखोर आणि निराशावादी लोकांशी भागीदारी करू नका. विक्री करायला आणि काही उभारायला शिका. तुम्हाला ते दोन्ही जमले तर तुम्हाला कोणी थांबवु शकणार नाही. विशिष्ट ज्ञान, जबाबदारी व पत यानी सुसज्ज असणे गरजेचे आहे. तुम्ही कार्यरत नसताना, अगदी झोपेत असतानाही तुमच्यासाठी मालमत्ता निर्माण करणारी गोष्ट म्हणजे संपत्ती.


महाविद्यालयात जाऊन चार वर्षे पदवी मिळवणे आणि तीस वर्षे काम करत राहणे हा पैसा मिळवण्याचा जुना मार्ग झाला. आता तुम्ही नवीन व्यवसायाला नऊ महिन्यात सुरुवात करू शकता. तीन उत्पादनक्षम वर्षात तुम्ही श्रीमंत होऊ शकता. एखादी गोष्ट वरवर करण्यापेक्षा त्यात खोलवर शिरले पाहिजे तरच तुम्हाला हवे ते मिळेल. कारण तुम्ही एक किंवा दोन गोष्टीतच नैपुण्य मिळवू शकता आणि सहसा त्या गोष्टी तुम्हाला जवळच्या असतात. जर तुम्हाला मनासारखी गोष्ट, मनासारख्या लोकांबरोबर करायला मिळणार असेल तर त्यात मोठी गुंतवणूक करा. त्यात वर्षानुवर्षे टिकून राहिला तर तुमच्या नात्यांमध्ये, पैशांमध्ये तुम्हाला मोठा परतावा मिळेल.

व्यवसायात समभाग मालकीचे असणे ही जमेची बाजू आहे. जे लोक पैसे कमावतात त्यांच्याकडे कधी ना कधी कुठल्यातरी उत्पादनाची मालकी असते किंवा व्यवसाय असतो किंवा एखादा ब्रँडची मालकी किंवा पेटंट असते. स्टॉक खरेदी करणे हा सुरुवात करण्याचा एक चांगला मार्ग आहे

ज्या उत्पादनांना पुनरावृत्ती साठी अगदी कमी पैसे लागतात ती उत्पादने बनवणे हा प्रभावी बनण्याचा सर्वात नवीन मार्ग आहे. उदाहरणार्थ पुस्तके, माध्यमे, चित्रपट लेखन, सांकेतिक लेखन यासाठी तुम्हाला कसली परवानगी लागत नाही. शक्य होईल तेव्हा पैशापेक्षा स्वातंत्र्याची निवड करा. जर तुम्ही स्वतंत्र असाल आणि जे काही करता त्याला स्वतः जबाबदार असाल तर ते स्वप्नवत आहे. तुमच्या कल्पना विकून पैसे मिळवा. जास्त पैसे मिळतात तेव्हा जास्त जबाबदारी, जोखीम व माहिती लागते. मात्र तुम्ही विध्वंस होण्याची भीती टाळायला हवी. तुमचे सगळे भांडवल, सगळी बचत गमावण्यासारख्या कुठल्याच गोष्टी करू नका. नवल म्हणतात मला स्वतःला माझ्या कामापेक्षा, माझ्या निर्णय क्षमतेसाठी पैसे मिळालेले खूप आवडेल. अचूक निर्णय आणि विश्वासार्हता या गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत.

पैशामुळे तुमचे आर्थिक प्रश्न सुटतील, आनंदाच्या मार्गावरचे अडथळे दूर होतील पण आनंद मिळेलच असं नाही. पैसा वाईट नाही. पैशाचा हव्यास वाईट आहे. पैसा मिळायला लागल्यावर जीवनशैली न उंचावणे हा पैशाच्या प्रेमापासून दूर राहण्याचा खात्रीशीर मार्ग आहे.

सत्याला सोबत घेऊन तुम्ही सुरुवात करता तेव्हाच तुम्ही प्रगती करू शकता. सत्य पाहण्यासाठी अहंकाराला बाजूला केले पाहिजे. वास्तवाला समोर जाताना आपण आपल्याला बदलायला पाहिजे. आपण अमुक असले पाहिजे असा विचार म्हणजे ताण आणि आपण जसे आहोत तसे स्वीकारणे म्हणजे निवांत/ताणरहीत असणे. मला हे आवडते का असा विचार करण्यापेक्षा हे योग्य आहे का असा विचार करा. 'कौतुक नेमके करा आणि टीका सर्वसाधारण करा' हा वारेन बफे यांचा नियम पाळावा. चांगली पुस्तके शोधून ती आत्मसात करा. आयुष्यात तीन गोष्टी महत्त्वाच्या संपत्ती, आरोग्य आणि आनंद. आनंदी राहणे व आनंद वाढवणे एक कौशल्य आहे. तंदुरुस्ती व पौष्टिक आहार यासारख्या कौशल्याने तो वाढवता येतो. आपल्या आयुष्यात काहीतरी उणीव आहे ही भावना मनातून काढून टाकली तर तिथे आनंद राहतो. आपण इच्छांच्या जाळ्यात सापडून सतत मला या गोष्टींची गरज आहे असा विचार करतो. कशाचीच कमतरता न वाटणे म्हणजे आनंद. जेव्हा तुमच्या मनाला आंतरिक शांती लाभते, तुम्ही तृप्त होता तेव्हा तुम्ही आनंदी होता. नवल म्हणतात, माझ्यासाठी आनंद म्हणजे बाहेरील गोष्टी बद्दलच्या इच्छांचा अभाव. आनंद या शब्दाचा अर्थ दुःख न करता, कशाची इच्छा न करता, भूत भविष्याचा फार विचार न करता सध्याचा क्षण




व वास्तव स्वीकारणे असा आहे. तुमच्या भावनांचे प्रतिबिंब जग तुमच्याकडे पाठवते. आपल्या आयुष्यात काही कमी आहे ही भावना मनातून काढून टाका म्हणजे तुम्हाला आनंद होईल.

तटस्थ स्थिती खरंतर योग्य स्थिती आहे. लहान मुले ह्या स्थितीत असतात. ती आजूबाजूची परिस्थिती आणि तो क्षण यात मशगुल असल्यामुळे आनंदी असतत. प्रत्येक अभिलाषा म्हणजे दुःखाला दिलेले आमंत्रण आहे. बाहेरच्या काही कारणाने आपल्याला आनंद मिळणार आहे असा विश्वास ठेवणे ही मोठी चूक आहे. यशाने आनंद कमावता येत नाही. तुमच्याकडेच आहे त्यात समाधानी असणे म्हणजे आनंद.

नवल म्हणतात मी कुठल्याही परिस्थितीशी पटकन जुळवून घेतो. आनंद हा आतून मिळतो हे माझ्या लक्षात आले. आता मी माझ्या आंतरिक गोष्टीवर लक्ष केंद्रित करायला सुरुवात केली आहे. तुम्ही जर शांत असाल तर त्याचे रूपांतर आनंदात होते. शांती मिळणे ही अवघड गोष्ट आहे. आयुष्याबरोबर वाहत जायचे व त्याचा बऱ्याच बाबतीत स्वीकार करायचा हे कौशल्य शिकायला हवे. समाजाच्या दडपणाखाली तुम्ही कुठलीही गोष्ट करता तेव्हा त्याचा अर्थ तुम्हाला ती प्रत्यक्षात करायची नसते. ती तुम्हाला असमाधानी बनवते. आयुष्य हा एकट्याने खेळायचा खेळ आहे तुम्ही एकटेच जन्माला येता आणि एकटेच मृत्यू पावणार आहात. तुम्ही आयुष्याचा जो अर्थ लावता तो एकट्याचा आहे. मत्सर हा आनंदाचा शत्रू आहे.

मृत्यूला सामोरे जाणे हे मूलभूत सत्य आहे. जेव्हा तुम्ही मृत्यूची दखल घेता तेव्हा आयुष्याला मोठा अर्थ प्राप्त होतो. आयुष्य लहान असते. जर तुम्हाला त्यातला फोलपणा, व्यर्थपणा कळला तर तुम्हाला आनंद व शांती मिळते. शक्य तितक्या सकारात्मकपणे आयुष्याचा अर्थ लावायला हवा.

शारीरिक स्वास्थ्य व मानसिक स्वास्थ्य अतिशय महत्त्वाचे आहे. साखर खाणे कमी ठेवा. जितकी अन्नावर प्रक्रिया जास्त तितके ते कमी खावे. व्यायाम जितका जोरदार तितका दिवस सहज सोपा. 'सोपी निवड, अवघड आयुष्य. अवघड निवड, सोपे आयुष्य.' हे लक्षात ठेवा. वाचनाच्या सवयी बरोबरच गणितातील कौशल्य व मन वळवण्याची कौशल्य ही देखील महत्त्वाची आहेत. ती तुम्हाला खऱ्या जगात वाट दाखवू शकतील. आयुष्यात सगळ्या गुंतागुंतीच्या आणि अवघड गोष्टींचा सामना करायला गणिताचा उपयोग होतो. स्वतःला मुक्त करा. परिपूर्ण असे कोणी नसते. प्रत्येक जण आपला प्रवास करतो. जसे आहात तसे रहा, स्वतःवर ताबा ठेवून रोखत राहणे म्हणजे वर्षानुवर्ष वाईट नाते, वाईट नोकरी सहन करत राहणे. लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करू नका. तुमच्या वेळेचे महत्त्व ओळखा. दुसऱ्याला खुश करण्यासाठी तुमचा वेळ वाया घालवू नका.

राग म्हणजे आपण दुसऱ्या व्यक्तीला आपण हिंसा करू शकतो हे सांगण्याचा संदेश. राग म्हणजे परिस्थितीवरचे नियंत्रण गमावल्याचे लक्षण. गौतम बुद्धानी सांगितले आहे, 'राग हा जळत्या निखाऱ्यासारखा आहे. जो तुम्ही हातात धरून दुसऱ्या कुणावर तरी फेकायची वाट बघत असता.' तुमच्या कृतीचे दीर्घकालीन परिणाम समजून घेणे म्हणजे शहाणपण. आयुष्यातले पैसा, नाती, प्रेम, आरोग्य किंवा सवयी हे सगळे लाभ चक्रवाढ व्याजाने मिळतात. नवल यांचे विचार विलक्षण आणि विचार करायला प्रवृत्त करणारे आहेत. आयुष्यातील चकाकत्या बाजू पलीकडे पाहायच्या त्यांच्या वृत्तीने, पुस्तक वाचताना वाचकांची जगाकडे पाहायची नजर बदलेल. वाचकांनाही यशस्वी आयुष्या बरोबर कौशल्ये प्राप्त करून आनंद व शांती याची अनुभूती मिळेल.

# देविदास लाड यांची राष्ट्रीय सेवक संघाच्या महाराष्ट्र राज्य सचिवपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** संत चरित्र ग्रुप सदस्य तथा सिन्नर येथील श्री गोरक्षनाथ स्मशानभूमी ट्रस्टचे सचिव देविदास विश्वनाथ लाड यांची सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व शैक्षणिक कार्याची दखल घेत राष्ट्रीय सेवक संघाच्या महाराष्ट्र राज्य सचिव पदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



धर्माचार्य सेवा फाउंडेशन (रजि) राष्ट्रीय सेवक संघ भारत चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष धर्माचार्य, धर्म गुरु योगी सनी नाथ महाराज तसेच राष्ट्रीय संयोजक भोगेंद्र लाल कर्ण, व राष्ट्रीय संगठन मंत्री घनश्याम शर्मा यांनी संपुर्ण भारत देशातील प्रत्येक भारतीय व्यक्तिच्या मनात देव देश धर्म प्रेम जागृत करत संपुर्ण भारत देशात संघाचे कार्य निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी हिंदुत्वाबद्दल व वैदिक धर्मा प्रती तळमळ असलेल्या व देव देश धर्मासाठी कार्य करणाऱ्या निष्कलंक कार्यकर्त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आध्यात्मिक कार्यात कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांची निवड करत असताना श्री गोरक्षनाथ स्मशानभूमी ट्रस्ट सिन्नर चे सचिव देविदास विश्वनाथ लाड यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आध्यात्मिक कार्याची दखल घेत त्यांची राष्ट्रीय सेवक संघाच्या महाराष्ट्र सचिव पदी एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर नियुक्ती बदल संपूर्ण भारत देशातील विवीध राज्यातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आध्यात्मिक मान्यवर, अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयाजी नाथ मुंबई, अखील भारतीय नाथ संघटना महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय अध्यक्ष बाबाजी नाथ जाधव अहमदनगर, पीर गणेश नाथ महाराज गोरक्ष पीठ त्र्यंबकेश्वर, पंचायती निरंजनी आखाड़ा महामंडलेश्वर स्वामी इंद्रदेवेश्वरानंद सरस्वती महाराज मथुरा, जुना आखाडा महामंडलेश्वर शिवगिरीजी महाराज नाशिक, अखिल भारतीय एकलव्य संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष आमदार शिवाजी ढवळे मुंबई, अंधेरी येथील प्रसिध्द गुरुद्वारा चे व्यवस्थापक व व्यावसायिक रविन्द्र सोहनलाल चोपड़ा मुंबई, महंत पीर शामनाथ महाराज (श्री क्षेत्र सोनारी भैरव पीठ), कालीकानंदजी महाराज नाशिक, कॅप्टन सुभाषचन्द्र योगी देहरादून उत्तराखंड, राष्ट्रीय सेवक संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष विजय नाथ पुणे, राष्ट्रीय हिंदु महासभा संघ भारत के राष्ट्रीय अध्यक्ष सिध्दार्थ शर्मा, संत चरित्र ग्रुप महाराष्ट्र राज्य कार्यकारणी व ग्रुप सदस्य, समस्त नाथपंथी समाज बांधव सिन्नर व नाशिक जिल्हा, श्री गोरक्षनाथ स्मशानभूमी ट्रस्ट सिन्नर, नवनाथ पंजीयन बहु उद्देशीय संस्था नाशिक, नाथपंथी समाज विकास क्रेडिट सोसायटी सिन्नर, नवनाथ क्रेडिट सोसायटी नाशिक, धर्मनाथ बीज महोत्सव समिति नाशिक, वधुवर मेळावा समिती नाशिक आदींनी अभिनंदन केले आहे.

## संपूर्ण भारत देशात राष्ट्रीय सेवक संघाचा विस्तार करणार

**वैदिक धर्म हिता साठी सदैव तत्पर राहणारा भारत देशात लवकरच मोठ्या स्वरूपात संगठन करणार असुन संघटनेचा प्रमुख उद्देश्य असा आहे की, हिंदू समाजात सामाजिक समरसता एकता स्थापित करने आहे. तसेच जो हिंदू समाज समाजाच्या मुख्य प्रवाहापासुन दुर गेले आहे, भरकटला आहे त्यांना पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, वैदिक हिंदू धर्माचा संस्कृतीचा परंपरांचा प्रचार प्रसार करने. हिंदू परिवारांना जागरूक करणे, आपली संस्कृति व सभ्यतेबद्दल माहिती लहान मुला मध्ये स्थापित करणे, वैदिक हिंदू धर्म संस्कृती व संस्काराचा प्रचार प्रसार करणे, नाथ पंथाचा योगाभ्यास याचा प्रचार प्रसार करते, आपला भारत देश अखंड राहो व भारत देश हिंदू राष्ट्र घोषित हो या करीता ही संघटना कार्य करत असुन संपूर्ण भारत देशात राष्ट्रीय सेवक संघाचा विस्तार करणार आहे.**

**श्री योगी सनी नाथ महाराज**
**राष्ट्रीय अध्यक्ष**

# चाळीसगाव तालुक्यात ८ मुन्नाभाई एमबीबीएस

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** चाळीसगाव तालुक्यात वैद्यकीय पदवी नसतानाही रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या ८ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. यातील सहा बोगस डॉक्टरांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. तर, यांपैकी दोन बोगस डॉक्टर पसार झाले आहेत.

खाजगी डॉक्टरांच्या संघटनेने चाळीसगाव तालुक्यात बोगड डॉक्टरांबद्दल आरोग्य विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुसार आज पंचायत समितीच्या आरोग्य विभागाच्या तालुकास्तरीय बोगस डॉक्टर कमिटीच्या ६ भरारी पथकांतर्गत एकूण १८ जणांनी तालुक्यात कारवाई केली. यात ८ पैकी सहा बोगस डॉक्टरांना पोलिसांच्या स्वाधीन केले असून दोन बोगस डॉक्टर पसार झाले आहे.यात चाळीसगाव तालुक्यातील पिलखोड येथील डॉ. संजय साळुंखे, डॉ. मृनाल टि. सरकार तर उपखेड येथील तन्मय दीपक पाठक, पोहरे येथील शहाजात कोमल मुजुमदार या चौघासह आणखी दोन जणांचा समावेश आहे. या बोगस डॉक्टरांविरोधात चाळीसगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून या कारवाईमुळे बोगस डॉक्टरांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.



# सावळदबारा-देव्हारी जीवघेण्या रस्त्याला आले तळ्याचे स्वरूप

## दै.आधुनिक केसरीच्या बातमीचा दणका; फर्दापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा, देव्हारी, पिंपळवाडी ते डोंगराच्या पायथ्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर सध्या मोठ मोठे खड्डे पडल्याने परिसरातील वाहनधारकांना, रुग्णांना, भाविक भक्त, कर्मचारी व विद्यार्थी यांना या रस्त्यावर मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यात खड्डे की खड्डयात रस्ता हे एक न उलगडणारे कोडे पडले आहे. या खड्डयांमुळे दिवसेंदिवस अपघातात वाढ होत असून आहेतच पण सावळदबारा येथील विटभट्टी जवळ भर रस्त्यावर रस्ताला तळाचे स्वरूप आले होते परंतु दैनिक अधुनिक केसरी मधे बातमी येताच सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर चे इंजिनिअर राठोड व सपोनि देवीदास वाघमोडे यांनी बातमीची दखल घेऊन तात्काळ कामाला सुरुवात करुन रस्त्यावर आलेले तळ्याचे स्वरूप पाणी कमी करून साईटने जेसीबीच्या साह्याने नाली करून दिली. सध्या पावसाने दिवस असल्याने काम करता येत नाही. पाऊस उघडला की पिंपळवाडी ते सावळदबारा हा रस्ता ओके करून देऊ, अशी ग्वाही याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम खातांनी दिली. या १० किमी रस्त्याचे अंतराचे अनेक वर्षापूर्वी डाबरीकरण व मजबुतीकरण झालेले होते. त्यानंतर रस्त्याची डागडुजी झालेली नसल्यामुळे त्याचे तीन तेरा वाजले आहे. परंतु आता लवकरच या कामाला सुरुवात होईल अशा विश्वास देव्हारी येथील ग्रामस्थांना दिला आहे. एक एक फुटांपर्यंत खड्डे पडले आहे.

> **रस्त्यात खड्डे पडल्यामुळे त्यात पावसाचे पाणी साचते. यामुळे वाहनधारकांना खड्डयांचा अंदाज येत नाही. यात अनेक नागरिक जखमी झाले आहे. लवकरात लवकर तो दुरुस्त करावा असे निवेदन देण्यात आले होते. आमच्या निवेदनाची बांधकाम विभागाने दखल घेतली. रस्त्यावर जमा झालेल्या पाणी कमी करून दिले.**
>
> **उत्तम चव्हाण, उपसरपंच, देव्हारी**

हा रस्ता श्री क्षेत्र चक्रधर मंदिर मार्गे नेहमी जात असल्याने भाविकांची नेहमी वर्दळ राहते. पुढील महिन्यात श्रावण महिना सुरु होत असल्यामुळे दररोज श्री चक्रधर स्वामी यांच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, जिल्हाभरातून भाविकांची मोठी गर्दी होत असते. दरवर्षी भाविकांना या खड्डेमय व जलमय रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय शेतकऱ्यांना आपला शेतमाल बुलढाणा येथील मार्केटमध्ये नेताना कसरत करावी लागत आहे.

> **दररोज महाराष्ट्रातून व जिल्हाभरातील भाविकांची श्री चक्रधर स्वामी मंदिर येथे गर्दी होते आणि शाळा, कॉलेज विद्यार्थी यांना यामुळे त्यांना ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती परंतु फर्दापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने या विटभट्टी जवळ तळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पाण्यामुळे खड्डाचा अंदाज येत नाही म्हणून छोटीमोठी वाहने खाली पडत होती. यामुळे आम्ही निवेदन दिले होते त्यांनी तत्काळ जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर साचलेले पाणी कमी नाली पाडून दिली आणि मंदिरावर येणाऱ्या भाविक भक्त व परिसरातील वाहनधारकांना होणारा त्रास कमी केला आहे.**
>
> **भाऊराव लक्ष्मण कोलते, सरपंचपती सावळदबारा**





# मुंबई-नागपूर महामार्गावर सावंगी चौकात साचले तळे

## करोडी ते लासूर स्टेशनपर्यंत खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा हेच कळेना

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील मुंबई-नागपूर महामार्गावरील वर्दळीच्या ठिकाणी सावंगी चौकात असलेल्या खड्ड्यात पाण्याचे तळे साचले असून यामुळे अपघाताला निमंत्रण देत असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांतून होत आहे.

दरम्यान ए.एस. क्लब ते लासूर स्टेशनपर्यंत हा राज्य महामार्ग म्हणजे खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे हेच कळत नसून दररोज या रस्त्यावर अनेक छोटे मोठे अपघात होते असून आत्तापर्यंत अनेक निष्पाप जिवांचा बळी या खड्ड्यांनी घेतला आहे. सोमवारी पोळ रांजणगाव येथे असणाऱ्या खड्ड्यात एक माल ट्रक पलटी झाला होता मात्र सुदैवाने यात कुठलीही जीवित हाणी झाली नाही. या रस्त्यावरील खड्ड्यात सध्या पाणी साचलेले असल्याने खड्ड्याच्या अंदाज प्रवाशांना येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वार या खड्ड्यात जाऊन पडल्याने जखमी होऊन शारीरिक वेदना सहन कराव्या लागत आहे.

> **राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागाला ए.एस. क्लब ते लासुर स्टेशन दरम्यानच्या रस्त्यावर झालेले खड्ड्याच्या बाबतीत काल सोमवारी माझ्यासाह संजय पांडव, अमोल जाधव (भाजयुमो), अशोक सौदागर यांनी भेट देऊन खड्डे बुजवण्याची मागणी केली होती अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर मंगळवारी खड्डे बुजवण्यास सुरुवात करण्यात आली असून आ.प्रशांत बंब यांच्या पाठपुराव्याने सदर रस्त्याचे दोन लेयर मजबुती करणाचे काम पावसाळा संपल्याबरोबर सुरू होणार आहे.**
>
> **रवींद्र पाटील चव्हाण (उपसरपंच, धामोरी)**

> **माझा व्यवसाय असल्याने माझे कायम औरंगाबादला येणे जाणे असते. मात्र मुंबई नागपूर महामार्गावर करोडी ते लासूर स्टेशनपर्यंत अनेक ठिकाणी खड्डेच खड्डे पडले आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्त्यात असणाऱ्या या खड्डयात पाणी साचते. त्यामुळे प्रवाश्याना या खड्डयाचा अंदाज येत नाही व त्यामुळे अनेक अपघात दररोज होत आहे. पोळ रांजणगाव येथे असलेल्या खड्डयात तर अनेक दुचाकीवरील महिला पडल्या असून जखमी झाल्या आहेत. किमान आत्तातरी या रस्त्यावरील खड्डे बुजवावे अशी मागणीही केली आहे.**
>
> **अन्वर शेख (प्रवाशी, लासूर स्टेशन)**

# अन्नधान्य वस्तूंवरील जीएसटी मागे घ्या; वंचित बहुजन आघाडी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दूध, पनीर, दही, लस्सी, पीठ, मुरमुरे, वाटाणा, गहू, तांदूळ, इतर धान्य, किराणा साहित्य, दुग्धपदार्थ अन्नधान्य यांच्यावर १२ ते १८ टक्के जीएसटी लागणार आहे. त्यामुळे आज भाजपासह केंद्र सरकारचा निषेध करून वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हा प्रशासनाला निवेदन दिल आहे.

महागाईचा भडका देशांमध्ये उडणार आहे. विविध अन्नधान्य पदार्थ, दुग्धजन्य पदार्थ, जीवनाश्यक वस्तू, किराणा साहित्य याच्यावर जीएसटीचा आकारणी खूप मोठ्या प्रमाण होणार असून यामध्ये पीठ, दही, पनीर, लस्सी, मखाना, सोयाबीन, वाटाणा, गहू, तांदूळ, मुरमुरे, चहा, कॉफी ब्रेड, गूळ पाव या सर्व विविध प्रकारच्या पदार्थावर १२ ते १८ टक्के जीएसटी आकारण्यात येणार आहे.

यामुळे गरीब सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले जात जाणार आहे. नागरिकांना महागाईचा फटका बसणार आहे. वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने आजजिल्हाधिकारी यांची यांची भेट घेऊन या संदर्भाचा केंद्रातील भाजप सरकारचा निषेध करून सदर जीएसटी मागे घेण्याची मागणी केली आहे.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122




माळीवाडा येथे आज सकाळी अकरा वाजता माळीवाडा येथील लक्ष्मण जगधणे यांच्या शेतात, ता.संभाजीनगर येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान अंतर्गत मका शेती शाळा अंतर्गत शून्य मशागत तंत्रज्ञान या विषयावर तांत्रिक समन्वयक जी.बी. खंडागळे, कृषी सहायक जे.बी. चितळकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. तसेच सांघिक खेळ घेण्यात आला. यावेळी शंकरराव बांभळे, बाबुराव मुळे, महादू फटांगडे, मुक्ताराम हेकडे, बाळु बनसोडे, सुरेंद्र जगधणे, लक्ष्मण जगधणे, राजु आढाव, शिवनाथ धनायत, रामेश्वर चोपडे व इतर शेतकऱ्यांनी सहभागी झाले होते.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे । आरोग्य । शिक्षण । पर्यावरण । सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार । सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष

रविंद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 । holdinghands092@gmail.com

# गॅस कनेक्शन शंभराला, सिलेंडर हजाराला

## उज्ज्वला गॅस योजनेचा उडाला फज्जा; गॅस दरवाढ परवडेना, महिला वळू लागल्या चुलीकडे

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** ग्रामीण भागातील महिला शेतातून सरपण आणून स्वयंपाक करायचा परंतु मागील काही वर्षापूर्वी उज्वला गॅस योजना अंमलात आली. ही योजना अंमलात आणताना गॅसचे दरही कमी होते व त्यावर सबसिडी देखील दिली जायची. त्यामुळे ग्रामीण भागात देखील सर्रास गॅसचा वापर होऊ लागला.



उज्वला गॅस योजना मुळे ग्रामीण भागातील घरातून चुलीद्वारे निघणारा धूर बहुतांश कमी झाला त्यामुळे धुरापासून होणाऱ्या श्वसनाच्या व डोळ्याच्या आजारापासून महिलांची मुक्त होऊ लागली व त्या धुरापासून महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम काही अंशी कमी झाले. त्यामुळे महिलांना वाटू लागले की आपला धुराचा वनवास संपला परंतु गॅस दरवाढीमुळे आर्थिक घडी कोलमडल्यामुळे पुन्हा महिला चुलीकडे वाळल्याचे चित्र दिसून येत आहे.

ग्रामीण भागातील महिला रानावनात सरपण, लाकूड-फाटा, काट्याकुट्यांचा वापर इंधन म्हणून करतात. स्वयंपाक का बरोबरच आंघोळीसाठी गरम पाणी चुलीवर गरम केले जायचे. धूर फुकत स्वयंपाक करावा लागत असे पावसाळ्याच्या दिवसात तर सरपण अक्षरशा ओले व्हायचे त्यावेळी चुलीवर स्वयंपाक करणे मुश्कील असायचे चुलीवर स्वयंपाक करणाऱ्या अनेक महिलांना डोळ्याचे व उसाचे आजार जडलेले आहेत. त्यावेळीच उज्वला गॅस योजना मुळे अनेक महिलांच्या जीवनात क्रांती झाल्यासारखे वाटत होते. पण आता दिवसेंदिवस होणारी गॅस दरवाढ महिलांची डोकेदुखी वाढवत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला गॅस कडून चुली कडे वळल्या आहेत.

**दरवाढीमुळे महिला चुलीकडे**

सरकारकडून दिवसेंदिवस गॅस ची होणारी दरवाढ महिलांची डोकेदुखी ठरत आहे. दिवसेंदिवस होणारी दरवाढ मोलमजुरी करून उपजीविका भागवणाऱ्या महिलांना महागाईमुळे गॅस परवडत नसल्याने महिला गॅस करून चुलीकडे वळले आहेत.

**पुन्हा धुरामुळे महिलांचे आरोग्य धोक्यात**

सुली मुळे होणारा दूर महिलांच्या सह कुटुंबाच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. चुलीच्या होणाऱ्या धुरामुळे डोळ्याचे आणि श्वसनाचे आजार उद्‌भवू शकतात.

# सावळदबारा ते जामठी रस्त्याच्या कामासाठी दिली वनविभागाने मंजुरी

## आ.अब्दुल सत्तार यांच्या प्रयत्नाला यश : धरमसिंग चव्हाण यांनी मानले आभार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा, टिटवी, गोद्री-पळासखेडा शिवारातील वनविभागाच्या जागेतून रस्ता करण्यासाठी प्रादेशिक वनविभाग नागपूर यांनी कायदेशीर सर्व बाबींची आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रयत्न करुन दिलेला शब्द पूर्ण केला आहे आणि आता पूर्तता करीत अंतिम परवानगी दिल्याने सावळदबारा-जामठी सावळदबारा रस्त्याचा तिढा सुटला आहे. यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांचे सातत्याने प्रयत्न सुरू होते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून त्यामुळे ५० वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न सुटला आहे. यामुळे सारा गावांकडे जाणाऱ्या नागरिकांचे ३० किलोमीटरचे अंतर कमी होणार आहे. याचा फायदा सारा सावळदबारा सर्कलच्या ग्रामस्थांना होणार आहे.

**असे होणार अंतर कमी**

फर्दापूरहून सावळदबाराकडे जाण्यासाठी जामनेर तालुक्यातील फतेपुर मार्गे जावे लागते. आता फर्दापूरहून थेट जामठी, गोदी-पळसखेडा मार्गे जाता येईल. यामुळे जवळपास ३० किलोमीटर अंतर कमी होणार असून पळसखेडा, टिटवी, सावळदबारा, देव्हारी, महाल्बा, हिवरी, मोलखेडा, घाणेगाव, गाव तांडा, चारुतांडा, नांदातांडा, नांदा, डाभा आदी गावांना याचा फायदा होणार आहे.

लांबीचा रस्ता करण्यासाठी परवानगी सरकारला भरण्यात आले. तसेच अशी मिळाली परवानगी देण्यात आली आहे. यासाठी निमखेडी शिवारातील ९. २४ हेक्टर गोद्री पा शिवारातील सार्वजनिक बांधकाम विभागातून गायरान जमीन वन विभागाला १४ गावांना याचा फायदा वनविभागाच्या क्षेत्रातून ५ किलोमीटर १ कोटी ९० लाख रुपयांचे चलन हस्तांतरित करण्यात आली आहे.



**सोयगाव तालुक्यातील नागरीकांसाठी जामठी, सावळदबारा रस्त्याचा प्रश्न प्रलंबित होता. अनेक वर्षांपासून याबाबत पाठपुरावा सुरू होता. वनविभागाने त्यांच्या क्षेत्रातून रस्ता करण्यासाठी परवानगी दिल्याने या भागातील नागरीकांना न्याय मिळाला आहे. यासाठी सर्व प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्या असून लवकरच कामाला सुरुवात होईल. आमदार-अब्दुल सत्तार यांचे खरोखरच सावळदबारा सर्कलच्या वतीने आभार मानतो.**

**धरमसिंग चव्हाण, माजी सभापती नादांतांडा**

**१९०६ पासूनचा प्रस्ताव प्रलंबित होता. २००९ साली माजी राज्यमंत्री आ. अब्दुल सत्तार यांनी विधानसभेत याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला. यासाठी सत्तार यांनी केंद्र व राज्य सरकार तसेच मध्य प्रदेशातील भोपाळ येथील वनविभागात कायम पाठपुरावा केल्याने यश आले असून अखेर ५० पासून प्रलंबित पडलेला प्रश्न मार्गी लावला आहे, मी अभिनंदन करतो.**

**सुरेश चव्हाण (सामाजिक कार्यकर्ते) घाणेगांव तांडा**

**अशी मिळाली परवानगी**

टिटवी, गोद्री-पळसखेडा शिवारातील वनविभागाच्या क्षेत्रातून पाच किलोमीटर लांबीचा रस्ता करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातून १ कोटी ९० लाख रुपयांचे चलन सरकाराला भरण्यात आले. तसेच निमखेडी शिवारातील ९.२४ हेक्टर गायरान जमीन वनविभागाला हस्तांतरित करण्यात आली आहे.



# विदर्भातील पूरग्रस्त जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा

## खासदार बाळू धानोरकर यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** विदर्भात ८ जुलै ते १५ जुलै दरम्यान मुसळधार पावसाने थैमान घातल्याने हजारो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली असून अनेकांच्या घरांची पडझड झाली आहे. मनुष्यहानी व पशुधनाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली, वर्धा या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस आल्याने यासह विदर्भातील अन्य जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची लोकहितकारी मागणी महाराष्ट्रातील काँग्रेसचे एकमेव खासदार बाळू धानोरकर यांनी मुख्यामंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील १३ हजार २३९ हेक्टर शेत जमीन पाण्याखाली अथवा वाहून गेली असून २०१५ चा याबाबत जो शासन निर्णय आहे. त्यानुसार केवळ ३४ हजार प्रति हेक्टर मदतीची तरतूद आहे. या निर्णयाला ७ वर्षे लोटून गेल्याने यात भर घालून हेक्टरी ६० हजाराची मदत शासनाने जाहीर करावी अशी मागणी पत्राच्या माध्यमातून खासदार बाळू धानोरकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

शेतकऱ्याने शेतात पिकांची लागवड केली होती. परंतु या पावसामुळे त्यांचे पीक वाहून गेले. आता त्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे. शेतीच्या नुकसानीसोबतच हजारो घरांची पडझड तसेच मनुष्यहानी व पशुधन हानी देखील मोठ्या प्रमाणात झाली आहे. प्रभावित क्षेत्रांमध्ये अद्यापही विद्युत पुरवठा खंडित आहे. या सर्वांवर प्रभावीपणे मदत शासनाने मदत करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



# शिरसाठ यांच्या प्रयत्नाने काटेपिंपळगाव ते गंगापूर बससेवा सुरु

आधुनिक केसरी न्यूज




**गंगापूर :** कोरोना प्रादुर्भाव तसेच त्यानंतर झालेला एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप यामुळे काटेपिंपळगाव- गंगापूर एसटी बस गेली अनेक दिवसांपासून बंद होती. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन मोठी गैरसोय होत होती. अनेक विद्यार्थ्यांना काटेपिंपळगाव ते महालगाव असा प्रवास करून मग तिथून गंगापूरला शिक्षण घेण्यासाठी यावे लागत होते. याबाबत काटेपिंपळगाव येथील नागरिक अप्पासाहेब धोत्रे व ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष वाल्मीक शिरसाठ यांच्याशी संपर्क साधून सविस्तर माहिती दिली.

त्यानुसार शिरसाठ यांनी तात्काळ गंगापूर एसटी आगाराचे प्रमुख जवळकर तसेच श्री मुक्तानंद महाविद्यालय येथील प्राचार्यांशी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली तसेच या विद्यार्थिनींना नियमानुसार तात्काळ मोफत पासेस देणे बाबतची कारवाई करणे बाबत संबंधितांना सूचित केले. त्यानुसार आज सकाळी काटेपिंपळगाव ते गंगापूर ही बस नियमितपणे विद्यार्थी घेऊन गंगापूरला आली. या मार्गावरील काटेपिंपळगाव, खडक वाघलगाव, झोडेगाव, शिंगी येथून दररोज जवळपास तीस ते पस्तीस मुले शिक्षण घेण्यासाठी गंगापूरला येतात. यावेळी स्थानिक नागरिकांनी एसटीचे चालक व वाहक यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार केला. एसटीची सेवा चालू झाल्याबद्दल सर्व विद्यार्थी व पालक यांनी समाधान व्यक्त केले आहे.

काटेपिंपळगाव गंगापूर एसटी बस चालू झाली असली तरी काटेपिंपळगाव शिंगी रस्त्यावर असलेल्या एकाओढ्या वरील पुलाचे काम गेली दोन वर्ष बंद आहे. त्यामुळे एसटी गावापर्यंत जाण्यासाठी गैरसोय आहे. याबाबत तात्पुरती उपाययोजना करून या पुलाचे काम तात्काळ पूर्ण करणे बाबत गावकऱ्यांना सोबत घेऊन आम्ही प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे शिरसाठ यांनी सांगितले.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट


गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-

पाने ५३४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# नाथसागर @८२ टक्क्यांवर

## आपतकालीन बैठकीत तहसीलदारांच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तहसिलदार पैठण यांचे अध्यक्षतेखाली दि.२० जुलै रोजी नैसर्गिक आपत्ती उपाय - योजना तसेच धरण पाणीपातळी बाबत आयोजित आढावा बैठकीचे संबंधित खात्याच्या अधिकारी यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जायकवाडी धरणाची पाणीसाठवण क्षमता 102.60 टीएमसी इतकी असून सध्या धरणत ८२ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला असल्याची माहिती तहसिलदार निलावाड यांनी सांगितले.



पैठण तालुक्यात गेल्या पंधरा दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला असून नद्या, तलावात चांगल्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध झाला असल्याचे सांगून तहसीलदार निलावाड यांनी पावसाळ्याचा उर्वरीत कालावधी लक्षात घेऊन जर पावसाचे प्रमाण वाढते राहीले तर जायकवाडी धरणात निर्माण होणाऱ्या अधिकच्या पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने सर्व आवश्यक पूर्व तयारी करण्याचे निर्देश संबंधितांना दिले. यामध्ये धरणाच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात येणाऱ्या पाण्याची आवक नियंत्रित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेऊन नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्याचे निर्देश गावपातळीवर दवंडीच्या माध्यमातून तहसीलदार निलावाड यांनी दिले.
आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने इर्मजन्सी लाईट, बोट, लाईफ जाकेट, बोट मशिन, फायर सुट व इतर संबंधित जीवनसंरक्षक साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवावे. सर्व संबंधित यंत्रणांनी आपत्ती व्यवस्थापन चोखरित्या करण्याच्या दृष्टीने सज्ज रहावे. जायकवाडी धरणाची पाणीसाठवण क्षमता 102.60 टीएमसी इतकी असून सध्या धरणत ८२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.
आपत्कालीन परिस्थितीत जायकवाडी धरणातुन नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या जास्तीच्या विसर्गामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीस हाताळण्यासाठी पैठण शहरासह नदीकाठच्या गावातील सुरक्षित स्थळे, (मंगल कार्यालये, शाळा, प्रार्थना स्थळे व अन्य) रस्ते, पाणी पुरवठा, अन्न पुरवठा तसेच तत्सम बाबी पुरविण्यासाठी सुरक्षित स्थळांची पहाणी करुन घ्यावी. सदर पाहणी गट शिक्षण अधिकारी पैठण, संबंधित मंडळ अधिकारी व संबंधित तलाठी यांनी करुन घ्यावी. तसेच आपत्ती व्यवस्थापन संबंधित सर्वच अधिकारी यांनी या काळात एकमेकांशी संवाद साधत रहावा, अशा सुचना तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी केल्या.

# ओयो हॉटेलमध्ये बलात्कार करुन पीडितेचे फोटो व्हायरल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील युनिक इन ओयो हॉटेलमध्ये २१ वर्षीय तरुणीवर बलात्कार करून नंतर त्या तरुणीचे फोटो तिच्या मैत्रीणीला व आतेभावाला पाठवून बदनामी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पिडीत तरुणीने आझादनगर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन अहमदनगर येथील २३ वर्षीय तरुणावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला.
शहरातील ऐंशी फुटी रोड परिसरात राहणारी २१ वर्षीय तरुणी ही शिक्षण घेत असून तिने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, अहमदनगर येथील काकासाहेब हरीदास दहीफळे या तरुणाने ऑक्टोबर २०२१ मध्ये धुळ्यातील ग.नं. ५ मधील 'युनिक इन ओयो' या हॉटेलमधील रुममध्ये नेले. तेथे नेल्यानंतर मारहाण करून अंगावरील कपडे उतरविण्यास सांगितले. त्यानंतर कानाखाली मारुन त्याच्यासोबत सेल्फी काढण्यास भाग पाडले तसेच इच्छेविरुध्द शारिरीक संबध प्रस्थापित केले. इतकेच नव्हे तर बलात्कार केल्याची वच्यता केल्यास तुझे फोटो व्हायरल करेल व तुझ्या घरच्यांना सांगुन दईल, अशी धमकी दिली. त्यानंतर १८ जुलै २०२२ रोजी तरुणीची मैत्रीण व आतेभावाला टेलिग्रामवर तरुणीचे फोटो पाठविले व त्याला शिवीगाळ करुन धमकी दिली. त्यानुसार आझादनगर पोलिस ठाण्यात कामासाहेब हरीदास दहीफळे रा. अहमदनगर या तरुणावर भादंवि कलम ३७६, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोसई एल. एस. करंकार करीत आहेत.

# नांदुर्डी येथे आजपासून कीर्तन महोत्सवास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** श्रीक्षेत्र नांदुर्डी तालुका निफाड येथे संत सावता महाराज व संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिवार्षिक अखंड हरिनाम सप्ताह याही वर्षी बुधवार २१ जुलै २०२२ ते २८ जुलै २०२२ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व सावता महाराज मंदिर नांदुर्डी तालुका निफाड येथे होत असलेल्या या सप्ताहात महाराष्ट्रातील अतिशय नामवंत व विद्वान आणि प्रतिभावान किर्तनकारांची दररोज रात्री ९ ते ११ किर्तने आयोजित केली आहे.
दैनंदिन कार्यक्रम याप्रमाणे २१/७/२०२२ (गुरुवार) रात्री ९ ते ११ हभप एकनाथ महाराज चत्तर शास्त्री यांचे किर्तन, २२/७/२२ (शुक्रवार) रात्री ९ ते ११ हभप सुनील महाराज झांबरे (बीड), २३/७/२२ (शनिवार) रात्री ९ ते ११ हभप अशोक महाराज जाधव (पुणे), २४/७/२२ (रविवार) रात्री ९ ते ११ हभप बन्सी महाराज उबाळे, २५/७/२२ (सोमवार) रात्री ९ ते ११ हभप श्रावण महाराज आहीरे (कुकाणेकर), २६/७/२२ (मंगळवार) रात्री ९ ते ११ हभप पांडुरंग महाराज घुले (देहु), २७/७/२२ (बुधवार) रात्री ९ ते ११ हभप महादेव महाराज राऊत (बीड), २८/७/२२ (गुरुवार) हभप बंडातात्या कराडकर सकाळी ९ ते ११ काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसाद होईल.
तसेच या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र वारकरी भुषण मृदुंग सम्राट हभप.भरत महाराज पठाडे व मंगेश महाराज निकम हे युवा मृदुंगमणी साथ करणार असुन टि.व्ही. स्टार शास्त्रीय गायक, गायन अविष्कार हभप नारायण महाराज खिल्लारी व गायनाचार्य हभप प्रकाश महाराज सुरवशे, हभप विजयजी महाराज खवले हे गायक दैनंदिन होणाऱ्या कीर्तनाला गायनाची साथ देणार आहे.
याशिवाय दररोज सायं ४ ते ६ वा भागवताचार्य ह भ प राजेंद्र महाराज थोरात हे श्री संत चरित्र चिंतन याविषयावर प्रवचन सादर करतील. तरी सर्व वैष्णव हरिभक्तांना या कार्यक्रमाचा अवश्य घ्यावा, असे आवाहन सत्ता कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कन्नडमध्ये सेनेला खिंडार; माजी आ.नितीन पाटील शिंदे गटाच्या वाटेवर

आधुनिक केसरी न्यूज


**कन्नड :** माजी आमदार नितिन पाटील यांनी समर्थकांची कन्नड येथील निवासस्थानी बैठक आयोजित केली होती. यावेळी मतदार संघाचा शिंदे गटाकडुन आमदार मीच असणार व आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, नगर परिषद विविध निवडणुका शिंदे गटाकडुन लढवण्यात येईल, असे पत्रकार परिषदेमध्ये नितीन पाटील यांनी सांगितले.
पुढे बोलताना ते म्हणाले की, कन्नड तालुक्याचा विकास आपणच करू शकतो व धनुष्यबाण घेऊनच आमदार होणार

**तालुक्याचा खुंटलेला विकास, रस्त्यांची झालेली अवस्था, तालुक्यातील जनतेत असंतोष आहे म्हणुनच नितीन पाटील आमदार होतील तर मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार तालुक्याच्या विकास कामासाठी निधींची कमतरता भासणार नाही. तसेच मा.मंत्री अब्दुल सत्तार व मा.मंत्री संदीपान भुमरे यांच्या साथीमुळे ही विधानसभेची लढाई सोपी होईल.**
**डॉ. मनोज राठोड, जिल्हा बँक संचालक**



असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कन्नड तालुका शिवसेना व माझ्यावर प्रेम करणारे नेते, कार्यकर्ते माझ्या पाठीमागे असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सक्षम व सर्वांना सोबत घेवून चर्चा करतात, असे मुख्यमंत्री मी माझ्या आतापर्यंतच्या राजकीय कारकिर्दीत बघितले नाही, असे पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले.
यावेळी बन्सीधर निकम, कौतिकराव पवार, धनराज बेडवाल, पाडुरंग घुगे, विश्वासराव सोनवणे, वाल्मीक लोखंडे, मनोज राठोड, केतन काजे, मनोज देशमुख, सुरेश डोळस, अविनाश काळे, संदिप नरवडे, साहेबराव अकोलकर, कैलास अकोलकर, राजकुमार गंगवाल, आबासाहेब पवार, राहुल पाटणी, सुदाम बोडखे, नंदू जैन, नारायण जाधव, सदाशिव मगर यांच्यासह मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा बँक संचालक मनोज राठोड तर आभार पाडुरंग घुगे यांनी मानले.

# सौंदर्याचा सल्ला





डॉ. उज्ज्वला दहिफळे
(एम.सी.एच.प्लास्टिक सर्जरी)
ॲस्थॅटिक, लेसर ॲण्ड प्लास्टिक सर्जन

## लेसर उपचार

आधुनिक केसरी

सौंदर्य हे मानवास मिळालेले मोठे आभूषण आहे. सुंदर दिसण्यासाठी वेगवेगळे कपडे व दागिने वापरले जातात; पण नैसर्गिक सौंदर्याला कशाचीही तुलना येत नाही, हे सौंदर्य चिरकालीन टिकवून ठेवणे ही आजच्या आधुनिक काळाची गरज आहे. हे सौंदर्य स्त्री व पुरुष या दोघांनाही टिकवून ठेवण्याची गरज असल्याचे कारण म्हणजे आज सिनेकलावंत, मॉडेल्स, खेळाडू, जलतरणपटू, विद्यार्थी उद्योजक याबरोबरच गृहिणींनासुद्धा याची आवश्यकता आहे. हे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी लेसर हे एक वरदान आहे.
लेसर म्हणजे काय ?
(LESER) L-LIGHT, A-AMPLIFICATION, S-STIMULATED, E-EMISSION, R-RADIATION
लेसर लाईट हा एकत्रित केलेला एकरंगी, सरळ रेषेत असलेला तीव्र किरण आहे. लेसरमुळे खालील बाबींवर उपचार केले जातात.
शरीराच्या कोणत्याही भागावरील नको असलेल्या केसांसाठी कायमस्वरुपी उपचार, तारुण्यपिटीका किंवा मोड्या व त्यामुळे पडलेले खड्डे, रक्तवाहिन्यांच्या जाळया, काळया-निळया जन्मखुणा, डाग काळे तपकिरी आणि लाल म्हासे, चामखीळ, चेहऱ्यावरील वांग, गोंदण, उतारवयातील सुरकुत्या, पायावरील फुगलेल्या शिरा, शस्त्रक्रियेचे/मार लागुन झालेले व्रण, किलॉईड्स, प्रसूतिपश्चातचे स्ट्रेच मार्क, अनावश्यक केस केससंभार हे स्त्रीयांच्या सौंदर्याचे प्रतिक असले तरी याच केसांचे अस्तित्व शरीरावर इतरत्र व विशेषतः चेहऱ्यावर असणे हे त्यांच्याकरिता एक जन्मभर सलत राहणारी समस्या बनून राहते. शरीरावर इतरत्र व विशेषतः चेहऱ्यावर असणे हे त्यांच्याकरिता एक जन्मभर सलत राहणारी समस्या बनून राहते. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9850822648, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन जण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पोफाळी पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या हर्षी येथील रामराव मारकड (४०), गिरीधारी मारकड (३८) हे दोघे १९ जुलै २०२२ रोजी रात्री ८:३० वाजताच्या दरम्यान चिंरगवाडी या गावावरून उमरखेड पुसद रोडने हर्षी गावाकडे येत होते. हर्षी गावाजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटरसायकला जोरदार धडक दिली. या भीषण अपघात ते गंभीर जखमी झाले होते. घटनास्थळी बेशुद्ध अवस्थेत पडून असल्याने त्यांचा जास्त रक्तस्राव झाला होता. या घटनेची माहिती गावातील नागरिकांना कळतात त्यांनी तात्काळ अपघातग्रस्तांना ऑटो रिक्षाने पुसद येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर दोघांनाही शवविच्छेदन करण्यासाठी उपजिल्हा शासकीय रुग्णालय पुसद येथे दाखल करण्यात आले. त्यांच्या पाठीमागे आई-वडील, पत्नी, दोन मुले, एक एक मुलगी असा परिवार आहे. आज हर्षी येथील बाजारपेठ बंद ठेवण्यात आली आहे. सदर घटनेचा पुढील तपास पोफाळी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हाके यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार शामा लांडगे करीत आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in